दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
वैभव विवेक स्वामी
संपादक
SAMARTH RAJYOG
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२६१ रविवार दि.३१ मे २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-261 Sunday, Dt.31 May 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## जिवंतपणी आधार नाही, पण मृत्यूनंतर माणुसकीने दिला खांदा..!

# दोन बेवारस जीवांना समाजसेवकांनी कुटुंबीयांसारखा दिला अखेरचा निरोप






बीड । प्रतिनिधी

माणूस मेला की त्याच्यासोबत सर्व संपते असे म्हटले जाते. पण काही माणसे अशी असतात की, ती स्वतःच्या कृतीतून माणुसकी अजूनही जिवंत असल्याचा विश्वास समाजाला देत असतात. बीड शहरात घडलेली अशीच एक हृदयस्पर्शी घटना समाजाच्या संवेदनांना साद घालणारी ठरली आहे. जिवंतपणी ज्यांना आधार देण्यासाठी कोणी नव्हते, अशा दोन बेवारस व्यक्तींना मृत्यूनंतर मात्र समाजसेवकांनी कुटुंबीयांप्रमाणे खांदा देत सन्मानाने अखेरचा निरोप दिला.

आजच्या धावपळीच्या, स्वार्थी आणि भौतिक सुखांच्या मागे धावणाऱ्या समाजात नाती, माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व कमी होत असल्याची खंत अनेकदा व्यक्त केली जाते. अशा काळात बीडमधील काही समाजसेवकांनी केलेल्या या कार्याने समाजासमोर एक जिवंत आदर्श उभा केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चकलंबा परिसरातील एक निराधार महिला भीक मागून आपला उदरनिर्वाह करत होती. प्रकृती गंभीर झाल्यानंतर तिला उपचारासाठी बीड येथे दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतानाच तिचे निधन झाले. तिच्या मृत्यूनंतर अंत्यसंस्कारासाठी एकही नातेवाईक अथवा ओळखीची व्यक्ती पुढे आली नाही. त्यामुळे तिचा मृतदेह बेवारस अवस्थेत पडून होता.

याच दिवशी नेकनूर परिसरातील एका वृद्ध व्यक्तीचेही निधन झाले. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठीही कोणीच पुढे आले नाही. आयुष्यभर संघर्ष करत जगलेल्या या दोघा जीवांचा शेवटही एकाकीपणात होणार, असे चित्र निर्माण झाले होते.

मात्र ही बाब समोर येताच बीडमधील समाजसेवकांनी तात्काळ पुढाकार घेतला. या दोघांनाही आपल्या कुटुंबातील सदस्य समजून त्यांच्या अंत्यसंस्काराची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली. धार्मिक विधी, सन्मानपूर्वक अंत्ययात्रा आणि सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला.

अंत्यसंस्कारावेळी उपस्थित असलेल्या अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते. जिवंतपणी ज्यांच्या आयुष्यात आपुलकीचा हात कमी पडला, त्यांना मृत्यूनंतर तरी सन्मान मिळावा, या भावनेतून समाजसेवकांनी केलेले हे कार्य प्रत्येक संवेदनशील मनाला अंतर्मुख करणारे होते.

ही घटना केवळ दोन बेवारस व्यक्तींच्या अंत्यसंस्कारापुरती मर्यादित नाही. ती आजच्या समाजाला एक गंभीर प्रश्न विचारते-आपल्या आजूबाजूला असे किती लोक आहेत, जे जिवंतपणीच समाजापासून तुटलेले आहेत ? वृद्धापकाळ, गरिबी, एकटेपणा आणि सामाजिक उपेक्षा यामुळे अनेकांचे जीवन अक्षरशः बेवारस होत चालले आहे. अशा वेळी शासन, प्रशासन आणि समाज या तिन्ही घटकांनी अधिक संवेदनशील होण्याची गरज अधोरेखित होते.

या अंत्यविधीसाठी पोलीस प्रशासनानेही आवश्यक सहकार्य केले. पोलीस आणि समाजसेवकांच्या संयुक्त प्रयत्नातून पार पडलेला हा अंत्यविधी सामाजिक बांधिलकीचे एक प्रेरणादायी उदाहरण ठरला.

आज समाजात नात्यांची व्याख्या बदलत असताना या समाजसेवकांनी रक्ताच्या नात्यांपेक्षाही माणुसकीचे नाते मोठे असते, हे आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.

### असंवेदनशील प्रशासन.... अन् ताटकळले मृतदेह..!

गेवराई तालुक्यातील चकलांबा हद्दीतील एका बेवारस मृत्यू पावलेल्या वयोवृद्ध मातेचा पोलीस कॉन्स्टेबल सकाळी नऊ वाजता जिल्हा रुग्णालयातील पोस्टमार्टम विभागात अंत्यविधीसाठी मृतदेह ताब्यात घेण्यासाठी थांबले होते. रखरखत्या उन्हात तब्बल चार तासानंतर पोस्टमार्टम करून साडेबारा वाजता मृतदेह ताब्यात देण्यात आला. सकाळी अकरा वाजल्यापासून बीड नगरपालिकेच्या सत्ताधारी आणि प्रशासकीय यंत्रणेला सांगितलेले असताना सुद्धा बिंदुसरा नदीच्या पात्रामध्ये अंत्यविधी साठी खड्डा करण्यास जेसीपी तब्बल चार तास आला नाही. त्यामुळे भर उन्हात दोन्ही बेवारस मृतदेह ठेवण्याची वेळ सामाजिक कार्यकर्त्यांवर आली. मृत्यूनंतरही त्या बेवारस मृतदेहाची आवेहलना होऊ नये म्हणून सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन सदरील अंत्यविधी केला.मात्र भविष्यात अशी अवहेलना प्रशासकीय यंत्रणे कडून होऊ नये याची दखल घेणे गरजेचे आहे.

### अंतर्मुख करणारा प्रश्न...

जिवंत असताना ज्यांना दोन आधाराचे शब्द मिळाले नाहीत, त्यांना मृत्यूनंतर अनोळखी लोकांनी खांदा दिला. ही घटना समाजातील संवेदनशील माणसांचा अभिमान वाढवणारी असली, तरी आपल्या सामाजिक व्यवस्थेचे आत्मपरीक्षण करायला भाग पाडणारीदेखील आहे.कारण माणुसकी जिवंत असल्याचा आनंद आहेच; पण माणसांना बेवारस होण्याची वेळ का येते, याचे उत्तर शोधणे त्याहून अधिक गरजेचे आहे.

### बीडमध्ये मानवतेचे हृदयस्पर्शी दर्शन

#### बेवारस व्यक्तींच्या अंत्यविधीसाठी सदैव तत्पर – वैभव स्वामी

जिव्हाळा बेघर निवारा केंद्रासह ज्याही बेवारस व्यक्तींचा मृत्यू होईल त्यांच्या अंत्यविधीसाठी पत्रकार संघ कायम तत्पर राहून पुढाकार घेईल, असे श्रद्धांजली पर मनोगत व्यक्त करताना पत्रकार वैभव स्वामी यांनी मत व्यक्त केले.

#### अंत्यविधीसाठी यांनी घेतला पुढाकार..

या कार्यात समाजसेवक राजू वंजारे, अभिजीत वैद्य, पत्रकार वैभव स्वामी, राजूभाऊ गुळभिले, विजय पंडित, डॉ. संजय तांदळे, गणेश माने, छाया सरोदे, किरण डोळस, सारिका गायकवाड आणि यश वंजारे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

---

# आंबेजोगाई तहसीलदाराच्या निलंबनासाठी प्रशासनाचं घोड नेमकी कोणती पेंड खात आहे - प्रिया झांबरे

### जिल्हाधिकारी,विभागीय आयुक्त साहेब, शिस्तभंग– दप्तर दिरंगाई –निलंबन यापैकी कुठलीच कारवाई होत नाही




### तेंव्हा कारवाई होऊ नये म्हणून तुमच्यापर्यंत काही पोहोचले की काय....?

अंबाजोगाई / सुनील सिरसाट

आंबेजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे यांच्याविरुद्ध आंबेजोगाई शहरासह तालुक्यातून कामांची आडवणूक होत असल्याबाबत आणि गैरमार्गाने गैर कामे केल्याबद्दल सर्वसामान्य नागरिकांपासून ते इतर सर्वच वर्गातून गेल्या वर्षभरापासून मोठ्या प्रमाणात ओरड सुरु आहे. तरीही त्यांच्यावरती निलंबन तर सोडा, साधी शिस्तभंगाची, दप्तर दिरंगाईची ही कारवाई होत नाहीये. मग यातून नेमके काय गौडबंगाल समजावे असा प्रश्न चंद्रपूर येथील सामाजिक कार्यकर्त्या प्रिया झांबरे यांनी उपस्थित केला आहे.

आंबेजोगाईचे तहसीलदार व त्यांच्या हाताखालील काही निवडक तलाठी, मंडळाधिकारी यांनी मिळून धनदांडग्यांकडून व लँडमाफियांकडून मोठ्या प्रमाणात टेबलाखालून आव्हाची सव्वा रक्कम घेऊन अनेक चुकीची कामे चुकीच्या मार्गाने केल्याचे पुरावे जमा करून उपजिल्हाधिकारी-जिल्हाधिकारी ते आयुक्त आणि सरकार दरबारी देऊनही तहसीलदार यांना पाठीशी घालत अपेक्षित चौकशी न करता किंवा समितीकडून तहसीलदारांचा बचाव करण्यासाठी चुकीचा अहवाल देत मी केलेल्या तक्रारी संबंधित अपेक्षित अशी कुठलीही चौकशी न करता वरच्यावर थातूरमातूर उत्तरे देऊन माझ्या तक्रारी निकाली काढण्याचा प्रताप वरिष्ठ कार्यालयाकडून घडला आहे. तर काही प्रकरणांमध्ये तलाठी मंडळ अधिकारी आणि उपजिल्हाधिकारी कार्यालयातील नायब-तहसीलदार हे अंशतः दोषी असल्याचा अहवाल माझ्या हातात देऊन माझे समाधान करण्याचा केविलवाणा प्रयोग या ठिकाणी उपजिल्हाधिकारी - जिल्हाधिकारी कार्यालयाकडून केला असल्याचा आरोप या ठिकाणी प्रिया झांबरे यांनी केला आहे.

तहसीलदार कोणत्या प्रकरणात कसे दोषी आहेत हे मी पुराव्यानिशी मा.ना. महसूलमंत्री यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून तक्रार केल्यानंतर महसूल मंत्री महोदयांनी तात्काळ माझ्या तक्रारीची दखल घेऊन विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी, बीड यांनी सात दिवसाच्या आत प्रशासनाकडे तहसीलदार तरंगे यांची चौकशी करून अहवाल पाठवावा असे आदेशित केल्यानंतरही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी चक्क महसूल मंत्री महोदयांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत तीन-चार महिने लोटून गेले तरीही अद्याप त्या आदेशाच्या अनुषंगाने कुठलाही अहवाल पाठवणे तर सोडा तयारही केला नाही. त्यामुळे मी वैयक्तिक विभागीय उपायुक्त यांची भेट घेऊन लेखी आणि तोंडी तक्रार करून सखल चौकशीची मागणी केली असता त्यांनीही मला उडवाउडवीची उत्तरे देऊन हा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहे आणि तसा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडून यावा लागतो. म्हणून माझी तात्पुरती समजूत काढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे माझा संशय आता चांगलाच बळावला असून आंबेजोगाई तहसीलदार विलास तरंगे यांनी केलेली गैरप्रकरणे अत्यंत चुकीची असून ती खूप मोठ्या घबाडाची (पैशांची) असल्याने आपल्यावर बदली होईपर्यंत कुठल्याही प्रकारची कारवाई होऊ नये म्हणून विलास तरंगे यांनी उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई सोडता जिल्हाधिकारी-विभागीय उपायुक्त-आयुक्त यांच्यापर्यंत तर काही मलिदा पोहचविला नाही ना..? अशी शंका आता मोठे घर करत असल्याचे तक्रारदार तथा सामाजिक कार्यकर्त्या प्रिया झांबरे यांनी आमच्या दैनिकाशी बोलताना आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. तेंव्हा खरच आता महसूल प्रशासनातील एवढ्या मोठ्या वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांची बदनामी जर एका भ्रष्ट तहसीलदार मुळे होत असेल तर आणि जर का वरिष्ठ अधिकाऱ्यांचा या प्रकरणात काडीमात्र संबंध नसेल तर, ते तहसीलदार यांना का पाठीशी घालत आहेत हेही त्यांनी समाजासमोर येऊन सांगावे. अन्यथा तहसीलदारांची योग्य ती सखोल चौकशी करून त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कार्यवाही करावी. कमीत कमी शिस्तभंग आणि दप्तर दिरंगाई तरी कारवाई तातडीने करून तक्रारदारासह सर्वसामान्य जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी जिल्हाधिकारी-विभागीय आयुक्त नेमका काय निर्णय घेतील हे पाहणे आता औस्तुक्याचे ठरेल.!

### मनोज जरांगे पाटील यांची उपोषण स्थळी जावून भेट घ्या

#### पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश

स्वतः भेट घेण्याची दाखवली तयारी, जरांगे पाटील यांनी कडक उन्हात उपोषणास बसणे प्रकृतीसाठी योग्य नाही

मुंबई /प्रतिनिधी

मराठा समाज बांधवांच्या आरक्षणाच्या मागणीसाठी कडक उन्हात आमरण उपोषणास बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांची उपोषण स्थळी जावून भेट घ्यावी, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्हयाच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

ना. पंकजाताई मुंडे यांनी यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना लेखी पत्र पाठवून निर्देश दिले आहेत. ना. पंकजाताई म्हणाल्या की, मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी श्री मनोज जरांगे पाटील भर उन्हात जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. जिल्हाधिकारी जिल्हयाच्या प्रशासनाचे प्रमुख असतात, या नात्याने आपण त्यांची तात्काळ भेट घ्यावी अशी माझी सूचना आहे. अशा कडक उन्हात त्यांचं आमरण उपोषण त्यांच्या प्रकृतीसाठी योग्य नाही.

स्वतः भेटण्याची दाखवली तयारी

जिल्हयाची पालकमंत्री म्हणून त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी आवश्यक असल्यास मी येण्यास देखील तयार आहे. आपण तात्काळ जावून त्यांची भेट घ्यावी, त्यांच्याशी चर्चा करून त्यांचे निवेदन स्वीकारावे असे ना. पंकजाताईंनी म्हटले आहे.



### पुरुषोत्तमपुरी येथे होमगार्ड जवानाच्या सतर्कतेमुळे बुडणाऱ्या भाविकाचे प्राण वाचले

माजलगाव प्रतिनिधी

अधिक मास यात्रेनिमित्त पुरुषोत्तमपुरी येथे आलेल्या एक भाविक नदीपात्रात बुडत असताना होमगार्ड जवानांच्या त्वरित कृतीमुळे जीव वाचला. बोटीच्या साहाय्याने त्याला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले.

अधिक मास यात्रेसाठी आले भाविक भक्त गोदावरीपात्रात स्नानासाठी गेले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने एक इसम पाण्यात बुडू लागला. ही घटना बंदोबस्तावरील होमगार्ड जवानांच्या लक्षात येताच त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता बोट घेऊन पाण्यात उडी मारली आणि त्या व्यक्तीला सुखरूप बाहेर काढले.

सतर्क जवानांची नावे..

या बचावकार्यात माजलगाव होमगार्ड पथकातील होमगार्ड राजेश पंडित, सुरेश भारस्कर सनद क्र. ९५० आणि मुजाहिद शेख सनद क्र. ७७९ यांनी धैर्य दाखवले. तालुका समादेशक अधिकारी मा. एम. एम. पांचाळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त लावण्यात आला होता. घटनास्थळी उपस्थित पलटन नायक एक बी. जी. शेख यांनी जवानांच्या सतर्कता आणि शौर्याचे विशेष कौतुक केले. होमगार्ड जवानांच्या या प्रसंगावधानामुळे एका कुटुंबावर येणारी मोठी आपत्ती टळली. सध्या माजलगाव पथकात या जवानांच्या कार्याची चर्चा होत आहे.

---

# परळी येथील पाटबंधारे कार्यालय अखेर परभणीला स्थलांतरित; ६ महिन्यांत परळीला दुसरा मोठा धक्का

बीड, लातूर आणि परभणी या तीन जिल्ह्यांचा सिंचन कारभार पाहणारे परळी येथील 'अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प मंडळ' हे महत्त्वाचे कार्यालय अखेर परभणी येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांनी प्रशासकीय कारणास्तव हा निर्णय घेतला असून, आगामी १ जूनपासून परभणीच्या नवीन मुख्यालयातून याचे कामकाज सुरू होणार आहे. गेल्या ३० वर्षांपासून परळीत असलेल्या या कार्यालयाचे स्थलांतर झाल्याने बीड जिल्ह्यातील नागरिकांमध्ये आणि शेतकऱ्यांमध्ये प्रशासकीय ढिसाळपणामुळे तीव्र संताप व चिंतेचे वातावरण आहे.

गेल्या सहा महिन्यांत परळीतून दुसरे मोठे कार्यालय हलविल्याने स्थानिक जनतेला मोठा राजकीय धक्का बसला आहे. यापूर्वी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या निधनानंतर परळीत सुरू झालेले 'गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाचे' विभागीय कार्यालय जानेवारी २०२६ मध्ये संभाजीनगर येथे हलवण्यात आले होते. त्यापाठोपाठ आता पाटबंधारे कार्यालयही गेल्याने परळीच्या राजकीय वजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

परभणी जिल्ह्यात जायकवाडी, लोअर दुधना आणि माजलगाव प्रकल्पाचे लाभक्षेत्र येत असल्याने सिंचनाच्या प्रश्नांसाठी तेथे स्वतंत्र मंडळाची गरज होती, असा दावा भगीरथ पाणी परिषदेने केला आहे. मात्र, या निर्णयामुळे आता बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना साध्या कामांसाठीही परभणीला चकरा माराव्या लागणार असल्याने त्यांच्या अडचणीत प्रचंड वाढ होणार आहे. संबंधित प्रभारी अधिकाऱ्यांना तत्काळ परभणीत रुजू होऊन आवश्यक पूर्तता अहवाल महामंडळास सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# गेवराई पोलिसांची मोठी कारवाई; अवैध दारु वाहतूक करणारा आरोपी पकडला

### ६ लाख ८ हजारांचा मुद्देमाल जप्त

गेवराई ।प्रतिनिधी

आगामी सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक नवनीत कॉँवत यांनी दिल्यानंतर गेवराई पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत देशी-विदेशी दारूची अवैध वाहतूक करणाऱ्या आरोपीस ताब्यात घेत तब्बल ६ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने गेवराई शहरात अवैध धंद्यांविरोधात धडक मोहीम सुरू केली आहे. दरम्यान, सावता नगर चौक परिसरातून अवैधरित्या देशी विदेशी दारूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली असता राम अश्रुबा कदम (वय ४५, रा. पंचायत समिती रोड, भिमनगर, ता. गेवराई, जि. बीड) हा त्याच्या ताब्यातील स्विफ्ट डिझायर (क्रमांक चक१२टत्र७९६४) मधून देशी-विदेशी दारूची चोरटी वाहतूक करताना आढळून आला. कारवाईदरम्यान वाहनातून सुमारे ८ हजार रुपयांची देशी-विदेशी दारू जप्त करण्यात आली. तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली स्विफ्ट डिझायर कार जप्त करण्यात आली असून एकूण ६,०८,००० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईत पोलीस अधिकाऱ्यांसह पथकातील कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

संपादकीय....

# मानवतेचा चेहरा हरपला!

दीर्घकाळापासून आजारी असलेले ज्येष्ठ व ख्यातनाम शायर बशीर बद्र यांनी भोपाळ येथे वयाच्या ९१ व्या वर्षी गुरूवारी अखेरचा श्वास घेतला आणि त्यांच्या 'एक्झिट'ने देश-विदेशातील रसिक चाहत्यांमधून एकच प्रतिक्रिया उमटली ती म्हणजे त्यांच्या जाण्याने मानवतेचा चेहरा हरपला! ही प्रतिक्रिया वा भावना उत्स्फूर्त होती कारण बशीर बद्र यांनी आपल्या शायरीतून आयुष्यभर मानवतेचा संदेश अत्यंत सहज सोप्या भाषेत प्रत्येकाच्या मनात उतरवत माणुसकीची भाषा दृढ केली. खरं तर त्यांना स्वत:ला माणुसकीला काळीमा फासणा-या घटनेला सामोरे जावे लागले होते. १९८७ च्या मेरठ दंगलीत बशीर बद्र यांचे घर, ग्रंथसंपदा, अप्रकाशित कविता समाजकंटकांच्या उच्छादात जळून खाक झाल्या मात्र तरीही त्यांचा माणुसकीवरील विश्वास हरवला नाही. त्यानंतर त्यांनी भोपाळमध्ये स्थायिक होत नव्याने आयुष्याला सुरुवात केली आणि अत्यंत शांतपणे आपल्या वेदनांना वाट करून देत उपद्रव करणा-यांनाही मानवतेचा संदेश देताना म्हटले-


बद्र यांना मागच्या अनेक वर्षांपासून स्मृतीभ्रंश विकाराने ग्रासले होते. अखेर भोपाळच्या राहत्या घरी 'उजाले अपनी यादों के रहने दे हजारे साथ, न जाने किस गली में जिंदगी की शाम हो जाए' अशी साद घालणारा हा शायर संध्याछायेत विलीन झाला. पद्मश्री पुरस्कारप्राप्त बशीर बद्र यांना स्मृतीभ्रंशाचा त्रास सुरू झाल्यावर त्यांचा सार्वजनिक वावर कमी होत गेला. कदाचित त्यांनी स्वत:च जाणीवपूर्वक तसा निर्णय घेतला असावा.

अशी उत्कट समंजसता व्यक्त करणारा हा शायर आपल्या आयुष्याच्या अखेरच्या काळात त्यांच्यावर प्रेम करणा-यांनाच ओळखेनासा झाला. आपली स्मृती आता साथ देत नाही, हे लक्षात आल्यावर त्यांनी गेल्या १० वर्षांपासून मुशाय-यांना जाणे बंद केले होते. बशीर बद्र हे त्यांच्या पिढीतील सर्वांत लोकप्रिय कवींपैकी एक कवी. त्यातही बशीर बद्र सामान्यातील सामान्यांच्या मनात घर करून राहिले कारण त्यांनी केवळ गझल लिहिली नाही तर गझलेला सामान्य माणसाची भाषा बनवली. बशीर बद्र यांनी मोठ्यात मोठी गोष्ट इतक्या साधेपणाने व सहज सोप्या भाषेत सांगितली की, थेट लोकांच्या हृदयाला भिडली, त्यांच्या मनात घर करून गेली.

# महाराष्ट्राची लोकमाता : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

कोल्हापूर

महाराष्ट्राच्या इतिहासाला अनेक थोर संत, समाजसुधारक आणि आदर्श राज्यकर्त्यांचा गौरवशाली वारसा लाभला आहे. त्या तेजस्वी परंपरेतील एक अद्वितीय आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर. लोककल्याण, न्यायप्रियता, धर्मपरायणता आणि सक्षम प्रशासन यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. म्हणूनच इतिहासाने त्यांना 'लोकमाता' आणि 'पुण्यश्लोक' ही उपाधी बहाल केली.




अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चौंडी या गावात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची प्रथा फारशी नव्हती; परंतु माणकोजी शिंदे यांनी अहिल्यादेवींना धार्मिक, नैतिक आणि व्यवहारज्ञानाचे शिक्षण दिले. बालपणापासूनच त्यांच्यामध्ये करुणा, परोपकार आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. असे सांगितले जाते की, मराठा साम्राज्याचे पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर यांनी एका मंदिरात लहान अहिल्यादेवींना भक्तिभावाने पूजा करताना पाहिले आणि त्यांच्या गुणांनी प्रभावित होऊन आपल्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह घडवून आणला. विवाहानंतर त्या माळवा प्रांतातील होळकर घराण्यात आल्या. त्यांचे वैवाहिक जीवन इंदूर आणि महेश्वर परिसरात गेले.

अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक कठीण प्रसंग आले. पती खंडेराव यांचे युद्धात निधन झाले. त्यानंतर सासरे मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. पुढे पुत्र मालेराव यांचाही मृत्यू झाला. या मोठ्या दुःखातून सावरत त्यांनी राज्यकारभाराची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली. त्या काळात स्त्रीने राज्यसत्ता चालवणे हे अत्यंत कठीण मानले जात होते; परंतु अहिल्यादेवींनी आपली बुद्धिमत्ता, धैर्य आणि प्रशासनकौशल्याने संपूर्ण माळवा प्रदेश सक्षमपणे सांभाळला.सन १७६७ ते १७९५ या काळात त्यांनी राज्यकारभार केला. त्यांची राजधानी महेश्वर येथे होती. त्यांच्या प्रशासनात प्रजेच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य होते. त्या दररोज जनतेच्या तक्रारी ऐकत आणि त्वरित न्याय देत. गरीब, शेतकरी, व्यापारी, स्त्रिया आणि दुर्बल घटकांच्या संरक्षणासाठी त्यांनी अनेक निर्णय घेतले.त्यांच्या न्यायप्रियतेविषयी अनेक कथा प्रसिद्ध आहेत. न्यायदान करताना त्यांनी कधीही पक्षपात केला नाही. स्वतःच्या नातलगांविरुद्धही त्यांनी न्यायाच्या तत्त्वांनुसार निर्णय दिले. त्यामुळे प्रजेमध्ये त्यांच्या विषयी अपार आदर निर्माण झाला. राज्यकर्त्याने प्रजेच्या सुखासाठी काम केले पाहिजे हा त्यांचा मूलमंत्र होता.

अहिल्यादेवींची ओळख केवळ एक सक्षम प्रशासक म्हणून नाही, तर लोककल्याणकारी आणि धर्मपरायण राज्यकर्ती म्हणूनही आहे. त्यांनी भारतभरातील अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा, विहिरी आणि यात्रेकरुंसाठी निवासस्थाने बांधली. उत्तर ते दक्षिण भारतापर्यंत त्यांच्या दानशूर कार्याचा ठसा दिसून येतो. लोकांना पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी, यात्रेकरुंना पाणवठा असा सर्वंकष विचार करुन त्यांनी विहिरी, बारवा, तलाव, कुंड, पाणपोया देशाच्या विविध भागात बांधल्या. ज्या काळात प्रदेशाप्रदेशात विभागणी होती त्या काळात 'बंधुता' पेरण्याचे काम तत्कालीन भारतात त्यांनी केले. त्यांनी काशी विश्वनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी मोठे योगदान दिले. तसेच सोमनाथ, गया, उज्जैन, नाशिक, द्वारका, रामेश्वरम, अयोध्या आणि हरिद्वार यांसारख्या तीर्थक्षेत्रांमध्ये घाट, मंदिरे आणि धर्मशाळा उभारल्या. वाराणसीतील अनेक घाट आजही त्यांच्या कार्याची साक्ष देतात. राज्यात व्यापार आणि शेतीला चालना मिळाली. रस्ते, पाणीपुरवठा, बाजारपेठा आणि सुरक्षाव्यवस्था यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यामुळे माळवा प्रदेश आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला. त्यांच्या प्रशासनात भ्रष्टाचाराला थारा नव्हता.

अहिल्यादेवींचा करारीपणा आणि धाडसी नेतृत्व अनेक प्रसंगांत दिसून आले. युद्धजन्य परिस्थितीत त्यांनी स्वतः सैन्याचे नेतृत्व केले. शत्रूंना पराभूत करताना त्यांनी धैर्य आणि रणनीतीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. स्त्री नेतृत्वाविषयी असलेल्या समाजातील मर्यादित कल्पना त्यांनी आपल्या कार्यातून मोडून काढल्या.

भारतीय इतिहासात त्यांच्या समकालीन अनेक प्रभावी महिला होऊन गेल्या. परंतु लोककल्याणकारी राज्यव्यवस्था आणि धार्मिक-सामाजिक कार्य यांच्या समन्वयामुळे अहिल्यादेवींचे स्थान विशेष मानले जाते.

अहिल्यादेवींना पुण्यश्लोक ही उपाधी देण्यात आली कारण त्यांनी आपल्या प्रजेला दुःखातून मुक्त करुन सुखी करण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या कल्याणासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या राज्यकर्त्यालाच पुण्यश्लोक म्हटले जाते. त्यांच्या कार्यामुळेच त्या आजही लोकांच्या मनात लोकमाता म्हणून जिवंत आहेत.

महाराष्ट्र शासनानेही त्यांच्या कार्याचा गौरव विविध प्रकारे केला आहे. त्यांच्या २९८ व्या जयंतीनिमित्त अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर असे करण्यात आले. १३ मार्च २०२४ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्षानिमित्त चोंडी येथे मंत्रिमंडळाची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. चौंडी, तालुका जामखेड, जिल्हा अहिल्यानगर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळाच्या जतन संवर्धनासाठी कोट्यवधीचा निधी दिला आहे. केंद्र शासनाने त्यांच्या ३०० व्या जयंतीला विशेष डाक तिकीट काढले. राज्य शासनाने पुण्यश्लोक ३०० हा विशेष लोगो प्रकाशित केला आहे.

आज महाराष्ट्र शासन त्यांच्या आदर्श राज्यकारभाराच्या तत्त्वांनुसार सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत आहे. महिलांचे सक्षमीकरण, उद्योग, शिक्षण आणि स्वावलंबन यासाठी अनेक उपक्रम सुरु करण्यात आले आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना...

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना ही महाराष्ट्रातील महिलांना उद्योग आणि उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणारी योजना आहे. या योजनेचा उद्देश महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे आणि नवीन व्यवसाय उभारण्यासाठी मदत करणे हा आहे.

या योजनेअंतर्गत महिलांना: स्टार्टअप व्यवसायासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण व कौशल्यविकास, आर्थिक सहाय्य व कर्ज सुविधा, उद्योग उभारणीसाठी सल्ला, नवउद्योजकांना प्रोत्साहन अशा सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना आत्मनिर्भर बनविण्याचा या योजनेचा मुख्य हेतू आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे न्याय, सेवा, धर्मपरायणता आणि लोककल्याण यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांचा आदर्श राज्यकारभार आजही प्रशासनासाठी मार्गदर्शक मानला जातो. लोकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारी त्यांची विचारसरणी आजच्या काळातही तितकीच महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी आहे.३१ मे २०२६ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त विशेष लेख.....

शब्दांकन.....

– प्रवीण टाके,उपसंचालक (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर ९७०२८५८७७७

# एनटीएला सुप्रीम फटकार

## यूपीएससीत पेपरफुटी नाही, त्यांच्याकडून धडा घ्या

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने आतापर्यंत अटक केलेल्यांची संख्या १३ वर पोहोचली आहे. सीबीआयने नीट पेपरफुटी प्रकरणात सखोल चौकशी सुरू ठेवली असून, अद्याप झाडाझडती सुरूच आहे. यंदा जवळपास २३ लाख विद्यार्थ्यांनी नीटची परीक्षा दिली. पण पेपरफुटीमुळे केंद्र सरकारने ही परीक्षा रद्द केली. आता २१ जून रोजी ही नीटची पुनर्परीक्षा होणार आहे. या पार्श्वभूमीवर सुप्रीम कोर्टाने नीट परीक्षा घेणा-या एनटीएला चागंलेच फैलावर घेतले आणि आतापर्यंत यूपीएससीची परीक्षा कधीच फुटली नाही, त्याचा आदर्श एनटीएने घ्यावा, अशा शब्दांत फटकारले.

नीट पेपरफुटी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर आज सुनावणी पार पडली. या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने नीट परीक्षा पेपरफुटीवरून एनटीएला फटकारले. आतापर्यंत यूपीएससी परीक्षेत कधीच पेपरफुटी झाली नाही. त्यांच्याकडून धडा घ्या, असे सांगत सर्वोच्च न्यायालयाने एनटीएला चांगलेच सुनावले. एनटीएची देखरेख यंत्रणा आणि पर्यवेक्षक समित्या असतानाही एवढी मोठी पेपरफुटीची घटना कशी काय घडू शकते, असा सवाल सुप्रीम कोर्टाने उपस्थित केला आणि एनटीएने यूपीएससीकडून शिकावे, असे बजावून सांगितले.

केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वत: या प्रकरणावर लक्ष ठेवून आहेत. परंतु यावर सर्वोच्च न्यायालयाने नीट परीक्षेचा पेपर रद्द झाल्याबद्दल चिंता व्यक्त केली आणि आता ही परीक्षा योग्यरित्या पार पाडली जाईल, याची खात्री करण्याचे निर्देश दिले. त्यावर केंद्र सरकारच्या वतीने अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी फेरपरीक्षेपूर्वी अनेक सुरक्षा उपाययोजना लागू केल्या जातील, असे सांगितले. त्याचवेळी सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकरणांमध्ये जोपर्यंत जबाबदारी निश्चित केली जात नाही, तोपर्यंत या घटना थांबणार नाहीत, असे म्हटले आणि




न्यायमूर्ती नरसिम्हा यांनी शिक्षण मंत्रालयाकडून नीट-यूजी परीक्षांच्या तपास प्रक्रियेचा तपशील मागवला.

यापूर्वी २५ मे रोजी यासंदर्भात सुनावणी झाली होती. त्यावेळीही सुप्रीम कोर्टाने एनटीएला फटकारले होते. न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा आणि न्यायमूर्ती आलोक अराधे यांच्या खंडपीठाने पेपरफुटीचा प्रकार अत्यंत दुर्दैवी आहे. एनटीएने यापूर्वी झालेल्या पेपरफुटीच्या प्रकरणातून कोणताही धडा घेतलेला नाही. २०२४ मध्येही पेपरफुटीचे प्रकरण कोर्टात पोहोचले होते. तेव्हा एक समिती स्थापन करण्यात आली होती, जिने अनेक शिफारसी केल्या होत्या आणि त्या स्वीकारल्याही होत्या. विशेष म्हणजे एनटीएने २८ मेपर्यंत प्रतिज्ञापत्र दाखल करावे आणि २०२४ मध्ये दिलेल्या सूचना आणि मॉनिटरिंग समितीच्या शिफारसींवर काय पावले उचलली गेली, हे सांगावे, असा आदेश दिला होता.

# उच्च न्यायालयांना ३ महिनेच निकाल राखीव ठेवता येणार

## विलंब नको, सर्वोच्च न्यायालयाने दिले निर्देश

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

कोणत्याही प्रकरणाचा निकाल राखून ठेवल्यानंतर तो ३ महिन्यांत सुनावला जावा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने आज दिले. जर असे झाले नाही तर रजिस्ट्रार जनरल हे प्रकरण उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांसमोर ठेवतील, असे स्पष्टपणे बजावले.



सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती विपुल एम पंचोली आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने जामिनाच्या प्रकरणांवर आदेश त्याच दिवशी सुनावला जावा. जर निकाल राखून ठेवला तर तो दुस-या दिवशी नक्कीच सुनावला जावा, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. प्रकरणांवरील वादविवाद आणि युक्तिवाद संपल्यानंतर निकाल राखून ठेवण्याची तारीख सर्व उच्च न्यायालये त्यांच्या वेबसाइटवर प्रदर्शित करतील.

पिला पहन आणि झारखंड सरकारशी संबंधित एक प्रकरण शुक्रवारी सरन्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सुनावणीसाठी आले होते. यात उच्च न्यायालयाने निकाल अपलोड केला नव्हता, असे म्हटले होते. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने वैयक्तिक स्वातंत्र्याशी संबंधित प्रकरणांत विशेषत: नियमित जामीन, अटकपूर्व जामीन आदी प्रकरणांत उच्च न्यायालयाने तत्परता दाखवावी. जामीन याचिकांवर त्याच दिवशी आदेश सुनावला आणि अपलोड केला पाहिजे. जर आदेश राखून ठेवला तर तो दुस-या दिवशी सुनावून वेबसाइटवर अपलोड केला पाहिजे. जामीन किंवा शिक्षेच्या स्थगितीचा आदेश मिळताच त्याची माहिती तात्काळ कारागृह प्रशासनाला पाठवली पाहिजे. जेणेकरून संबंधितास त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी सोडता येईल.

तर अर्ज करता येणार

निकाल राखून ठेवल्यानंतर ३ महिन्यांनीही निकाल दिला जात नसेल तर कोणताही पक्षकार निकाल जारी करण्यासाठी अर्ज करू शकतो. अशा अर्जाची दोन दिवसांच्या आत यादी केली जाईल. त्यातही निकाल ४ महिने लांबणीवर टाकला तर कोणताही पक्षकार थेट मुख्य न्यायाधीशांना विनंती करू शकतो.

# भीषण अपघात! ट्रॅव्हल्सची दुचाकीला जोरदार धडक

## चार तरुणांचा जागीच दुर्दैवी अंत; दुचाकीचा अक्षरशः चक्काचूर, परभणीच्या मानवत शहरातील घटना



परभणी-पाथरी महामार्गावरील राहुल जिनिंगसमोर अत्यंत भीषण अपघाताची घटना घडलीय. परभणीहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या एका ट्रॅव्हल्सने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील चारही तरुणांचा जागीच मृत्यू झालाय. या दुर्घटनेमुळे मानवत शहरावर शोककळा पसरली आहे.

परभणीहून पुण्याकडे जाणारी ट्रॅव्हल्स (क्रमांक छड ०१ इ १३७४)आणि मानवतच्या (चरपुरींह) राहुल जिनिंगसमोर समोरून येणाऱ्या दुचाकीला (क्रमांक चक २२ इइ ४७२४) ट्रॅव्हल्सने समोरासमोर जोर दार धडक दिली. हि धडक इतकी भीषण होती की दुचाकीचा अक्षरशः चक्काचूर झालाय. अपघाताचा मोठा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. या भीषण अपघातात दुचाकीवरील चारही तरुण जागीच ठार झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, मृतांची नावे शुभम आप्पाराव दहे (वय ३०), विष्णू गोरे (वय २८), प्रल्हाद अशोकराव कुटे (वय २९) आणि नवनाथ शामराव जाधव (वय ३८, सर्व रा. मानवत) अशी आहेत. अपघाताची तीव्रता इतकी मोठी होती की, मृतदेहांची अवस्था अत्यंत विदारक झाली होती. त्यामध्ये एका मृताची ओळख पटविणे सुरुवातीला पोलिसांसाठी आणि नागरिकांसाठीही कठीण झाले होते. घटनेची माहिती मिळताच मानवत पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप बोरकर, पोलीस उपनिरीक्षक किशन पतंगे, प्रमोद देवकते, शीतल बोर्डे तसेच अन्य पोलीस कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह रुग्णालयात हलवले तसेच अपघातग्रस्त वाहने बाजूला करत महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली.या अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. दरम्यान, या प्रकरणी मानवत पोलीस पुढील तपास करत आहेत. एकाच वेळी मानवत येथील चार तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त होत आहे.मडगाव रेल्वेस्थानकाच्या परिसरात उभ्या रिकामी रेल्वेच्या डब्याला आग लागली होती. अग्निशामक दलाने ही आग आटोक्यात आणली. मात्र ही आग समाजकंटकाकडून लावण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. तपासाअंती सत्य समोर येईल , अशी माहिती बबन घाटगे, वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी यांनी दिली आहे. सध्या रेल्वे कडून तपास सुरू आहे.

# यूपी-बिहारमध्ये पाऊस-वादळामुळे ४८ लोकांचा मृत्यू

## सहारनपूरमध्ये ट्रॅक्टरसह १० गाड्या वाहून गेल्या; बिहारमध्ये ४ विमानांचे मार्ग बदलले-१८ उशिरा

भोपाळ/जयपूर/लखनऊ/पाटणा

देशात उष्णतेच्या लाटेदरम्यान १५ राज्यांमध्ये पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. बिहारमध्ये गेल्या २४ तासांत वादळी पाऊस आणि वीज कोसळल्याने १७ लोकांचा मृत्यू झाला आहे. पाटण्यात पावसामुळे ४ विमाने वळवण्यात आली, तर १८ विमानांना उशीर झाला. यामुळे सुमारे ५०० हून अधिक प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागला. आज राज्यातील २५ जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे.

उत्तर प्रदेशात गेल्या २४ तासांत वादळी वाऱ्यामुळे ३१ लोकांचा मृत्यू झाला आहे. सहारनपूरमध्ये मुसळधार पावसानंतर डोंगरावरून वेगाने पाणी खाली आले. यामुळे इनोव्हा-ट्रॅक्टरसह १० वाहने वाहून गेली. आजही सर्व ७५ जिल्ह्यांमध्ये पावसाचा अलर्ट आहे.

राजस्थानमध्ये शनिवारी ३० जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता आहे. एक दिवसापूर्वी चुरू, हनुमानगड, बिकानेर, सीकरसह ९ जिल्ह्यांमध्ये तापमान १० अंशांपर्यंत खाली आले.

मान्सून ७ दिवसांत केरळमध्ये दाखल होईल

दरम्यान, भारतीय हवामान विभागाने सांगितले आहे की नैऋत्य मान्सून पुढील ७ दिवसांत केरळमध्ये दाखल होऊ शकतो. मात्र, विभागाने यावर्षी मान्सून सामान्यपेक्षा कमकुवत राहण्याचा अंदाजही वर्तवला आहे.जून ते सप्टेंबर या कालावधीत देशात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडू शकतो. यावेळी मान्सूनचा पाऊस दीर्घकालीन सरासरी च्या सुमारे ९०% राहण्याची शक्यता आहे. देशात सामान्य मान्सून पावसाची सरासरी ८७ सेंटीमीटर मानली जाते.

हवामान विभागाने सांगितले की, ईशान्य




भारतात सामान्य पाऊस पडू शकतो, परंतु इतर अनेक भागांमध्ये सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. विशेषतः पावसावर अवलंबून असलेल्या शेती क्षेत्रांमध्ये मान्सून कमकुवत राहू शकतो.

# कलम १४२ अंतर्गत बंधनकारक निर्देश जामिनानंतर लगेच सुटका

दिल्ली /वृत्तसंस्था

सर्वोच्च न्यायालयाने सर्व उच्च न्यायालयांसाठी जामीन आदेश, सुटका आणि निकाल सुनावण्याची कालमर्यादा निश्चित केली आहे. न्यायालयाने घटनेच्या कलम १४२ अंतर्गत विशेष अधिकारांचा वापर करत बंधनकारक मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती बिपिन एम. पांचोली यांच्या खंडपीठाने म्हटले की, जामीन अर्जांवर त्याच दिवशी निकाल सुनावण्यात यावा. जर निकाल राखून ठेवला असेल, तर तो दुसऱ्या दिवसापर्यंत सुनावून वेबसाइटवर अपलोड करावा लागेल.



झारखंड उच्च न्यायालयाच्या प्रलंबित राखून ठेवलेल्या निकालांमुळे हे प्रकरण समोर आले होते: हे प्रकरण झारखंड उच्च न्यायालयात निकाल सुनावण्यास आणि अपलोड करण्यास होणाऱ्या विलंबाशी संबंधित होते. सर्वोच्च न्यायालयासमोर असे एक प्रकरण आले, ज्यात सुनावणीनंतर निकाल २ वर्षे राखून ठेवला होता.

सुप्रीम कोर्टाचे अधिवक्ता अश्विनी दुबे यांच्या मते, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्देशानंतर हायकोर्टात निकाल राखून ठेवून प्रदीर्घ काळ प्रलंबित ठेवण्यास आळा बसेल. निकाल, जामीन आदेश व अपलोड करण्याची प्रक्रिया अधिक जबाबदार होईल. जामीन मिळाल्यानंतर सुटकेतील विलंब कमी होईल. गरजेनुसार केस दुसऱ्या खंडपीठाकडे सोपवण्यामुळे न्यायिक प्रक्रियेत पारदर्शकता आणि जबाबदारी वाढेल.

# 'एनईपी'च्या अंमलबजावणीसाठी आता राज्य शासनाकडून स्वतंत्र टास्क फोर्स:माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकरांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यीय समिती



मुंबई / प्रतिनिधी

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०' ची प्रभावी, सुसूत्र आणि एकसमान अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शैक्षणिक आणि प्रशासकीय पातळीवर येणाऱ्या विविध अडचणींचे निवारण करण्यासाठी शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने एक स्वतंत्र 'कार्यबल गट' (टास्क फोर्स ) गठित केला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे या टास्क फोर्सच्या अध्यक्षपदाची धुरा सोपवण्यात आली आहे.

का भासली टास्क फोर्सची गरज ?

केंद्र सरकारने २०२० मध्ये जाहीर केलेल्या या शैक्षणिक धोरणानंतर, महाराष्ट्रात डॉ. रघुनाथ माशेलकर समितीच्या शिफारशींनुसार नवीन अभ्यासक्रम आराखड्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणी दरम्यान विद्यापीठे आणि महाविद्यालयांना अनेक तांत्रिक व प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः क्रेडिट ट्रान्सफर, मल्टिपल एन्ट्री-एक्झिट , अंतर्गत मूल्यमापन, लॅटरल एन्ट्री आणि प्राध्यापकांचे प्रशिक्षण या बाबींमध्ये संपूर्ण राज्यात एकसमान धोरण नसल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण होत होती.

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंचाही समावेश


या टास्क फोर्समध्ये शिक्षण क्षेत्रातील नामांकित तज्ज्ञांचा समावेश आहे. अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. नितीन करमळकर (माजी कुलगुरू, पुणे विद्यापीठ) तर सदस्यपदी मुंबई विद्यापीठ, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव) आणि शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर) चे कुलगुरू, उच्च शिक्षण संचालक (पुणे) आणि तंत्र शिक्षण संचालक (मुंबई), डॉ. अनिल राव (निवृत्त प्राचार्य) आणि भरत अमळकर (शिक्षणतज्ज्ञ) यामध्ये असतील

# ग्राहकांची लूट थांबवण्यासाठी एमआरपी व्यवस्था उद्ध्वस्त करा ग्राहक पंचायतीचा एल्गार खासदार संजय जाधवांना घनसावंगीत घेरले

## लोकसभेत आवाज उठवणार खासदार बंडू जाधव यांचे ठोस आश्वासन

घनसावंगी ।प्रतिनिधी

बाजारपेठेत कमाल किरकोळ किंमत अर्थात एमआरपी चठझ च्या नावाखाली चाललेली सर्वसामान्य ग्राहकांची उघड आणि प्रचंड आर्थिक लूट आता सहन केली जाणार नाही ही लूट थांबवण्यासाठी सध्याची जुलमी एमआरपी व्यवस्था मुळासकट रद्द करा आणि त्याऐवजी ग्राहक धार्जिणे दर निर्धारण धोरण लागू करा अशी आक्रमक मागणी करत अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने परभणी लोकसभेचे खासदार श्री. बंडू उर्फ संजयजी जाधव यांना घनसावंगी येथे निवेदनाद्वारे थेट धारेवर धरले. ग्राहकांच्या या ज्वलंत प्रश्नावर खासदार जाधव यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद देत आगामी लोकसभा अधिवेशनात या लुटीविरुद्ध केंद्रीय पातळीवर आवाज उठवण्याचे छातीठोक आश्वासन दिले आहे.तरच ग्राहकांची लूट थांबेल निवेदनातील प्रमुख मागण्या अखिल भारतीय ग्राहक पंचायत जालना जिल्ह्याच्या वतीने देण्यात आलेल्या या



निवेदनात प्रशासकीय यंत्रणेचे डोळे उघडणारे मुद्दे मांडण्यात आले आहेत एमआरपी नावाचा पाशवी विळखा तोडा बाजारपेठेत वस्तूंच्या मूळ किमतीपेक्षा कैक पटीने जास्त एमआरपी छापून ग्राहकांचा खिसा कापला जात आहे. ही काळी व्यवस्था तातडीने रद्द झालीच पाहिजे.

नवे दर निर्धारण धोरण लागू करा सर्व पॅकिंग वस्तू औषधे आणि इतर जीवनावश्यक सामग्रीच्या किमती निश्चित करण्यासाठी केवळ कॉर्पोरेट कंपन्यांचा फायदा न बघता ग्राहक हिताचे स्वतंत्र व पारदर्शक दर निर्धारण धोरण लागू करण्यात यावे.

लोकसभेत रणशिंग फुंका हा विषय केवळ स्थानिक नसून संपूर्ण देशातील जनतेच्या जगण्याशी निगडित आहे. त्यामुळे खासदार संजय जाधव यांनी दिल्लीच्या संसदेत या अन्यायाविरुद्ध कडाडून मागणी करावी अशी आग्रही विनंती करण्यात आली.

खासदार संजय जाधवांचा शब्द संसदेत आवाज घुमणार

निवेदन स्वीकारल्यानंतर खासदार श्री.बंडू उर्फ संजय जाधव यांनी ग्राहक पंचायतीच्या पदाधिकाऱ्यांशी सखोल चर्चा केली. ग्राहकांची होणारी आर्थिक पिळवणूक अत्यंत गंभीर बाब असल्याचे मान्य करत खासदार म्हणाले हा थेट जनतेच्या खिशावर मारलेला दरोडा आहे. निवेदनात नमूद केलेली मागणी अत्यंत वाजवी असून या लोकलुटमारीच्या विरोधात मी आगामी लोकसभा अधिवेशनात संसदेच्या पटलावर निश्चितपणे आवाज उठवून केंद्र सरकारला जाब विचारीन

पदाधिकाऱ्यांचा आक्रमक पवित्रा हे ऐतिहासिक निवेदन देतेवेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष डॉ. रमेश तारगे, जिल्हा सहसचिव सुरेंद्र पोतदार, घनसावंगी तालुका अध्यक्ष मारोती सावंत आणि जिल्हा कार्यकारिणी सदस्य बाबासाहेब हेमके यांनी नेतृत्त्व केले. या आंदोलक पवित्रा वेळी मधुकराव बाबुराव मुळे, राहुल काळे यांच्यासह ग्राहक पंचायतीचे शेकडो कार्यकर्ते आणि सजग नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्राहकांच्या हक्कासाठी आता दिल्लीपर्यंत लढा देण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

# आकाशवाणी बीडच्या अक्षरलेणी कार्यक्रमात सुप्रसिद्ध कवी डॉ.हरीश हातवटे यांचे प्रभावी काव्यवाचन संपन्न

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) सुप्रसिद्ध कवी, साहित्यिक तथा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाळुंज, ता. आष्टी, जि. बीड येथील पदवीधर शिक्षक डॉ. हरीश नवनाथ हातवटे यांचे आकाशवाणी बीड केंद्रावर काव्यवाचनाचा कार्यक्रम उत्साहात व दिमाखात संपन्न झाला. त्यांच्या उत्कृष्ट साहित्यसेवेचा आणि काव्यप्रतिभेचा सन्मान म्हणून आकाशवाणी बीड केंद्राने त्यांना कविता सादरीकरणासाठी विशेष आमंत्रित केले होते. दिनांक ३० मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आकाशवाणी बीड केंद्राच्या लोकप्रिय अक्षरलेणी या साहित्यिक कार्यक्रमामध्ये डॉ. हरीश नवनाथ हातवटे यांनी आपल्या निवडक कवितांचे प्रभावी व दर्जेदार सादरीकरण केले. त्यांच्या काव्यवाचनामध्ये सामाजिक जाणीवा, ग्रामीण जीवनाचे वास्तव, मानवी भावना, संस्कारमूल्ये आणि जीवनातील सकारात्मकतेचा आशय प्रभावीपणे उमटल्याने श्रोत्यांनी कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले.

डॉ. हातवटे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत, भावपूर्ण आवाजात आणि आशयगर्भ शब्दांत कविता सादर करत उपस्थित श्रोत्यांवर तसेच रेडिओद्वारे कार्यक्रम ऐकणाऱ्या रसिकांवर वेगळी छाप पाडली. त्यांच्या सादरीकरणातील शब्दसौंदर्य, आशयाची खोली आणि सादरीकरणातील आत्मीयता यामुळे अक्षरलेणी कार्यक्रम अधिक समृद्ध झाल्याची भावना अनेक साहित्यप्रेमींनी व्यक्त केली. ग्रामीण भागात शिक्षक म्हणून जबाबदारी पार पाडताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबत साहित्य, संस्कार आणि वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे डॉ. हरीश हातवटे हे शिक्षक, कवी आणि साहित्यिक म्हणूनही परिचित आहेत. विविध सामाजिक, शैक्षणिक व साहित्यिक विषयांवर त्यांनी लेखन केले असून त्यांच्या कवितांमध्ये समाजमनाला स्पर्श करणारा आशय आढळून येतो.

आकाशवाणी बीडचे कार्यक्रम अधिकारी गोपाळ ठाकूर यांनी डॉ. हातवटे यांच्या दर्जेदार काव्यसादरीकरणाचे कौतुक केले. तसेच आष्टी तालुक्यातील




मित्रपरिवार, साहित्यप्रेमी, शिक्षकवर्ग व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. डॉ. हरीश नवनाथ हातवटे यांना आकाशवाणीसारख्या प्रतिष्ठित माध्यमावर काव्यवाचनाची मिळालेली संधी ही आष्टी तालुक्यासाठी अभिमानाची बाब मानली जात असून त्यांच्या या यशामुळे साहित्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या नवोदितांना प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने पेट्रोल डिझेल दरवाढी विरोधात आंदोलन

## इंधन टंचाई व दरवाढ तात्काळ कमी करा - राहुल सोनवणे

बीड/प्रतिनिधी

राज्यामध्ये मागील काही दिवसांपासून पेट्रोल डिझेल गॅसचा तुटवडा मोठ्या प्रमाणात सुरू असुन आज बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांच्या नेतृत्वात बीड येथे आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे म्हणाले की, सध्या शेतीच्या मशागती चे दिवस सुरू असून पेट्रोल डिझेल टंचाई व दरवाढ सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान व मानसिक हानी सुरू आहे मात्र पंतप्रधान मोदी परदेशात जावून चॉकलेट वाटण्याचे लाजिरवाणे काम करत आहेत. मागील बारा वर्षापासून देशात आणि राज्यात भाजपची एक हाती सत्ता असताना देखील महागाईवर कुठलेही नियंत्रण यासरकरचे दिसत नाही.लोकहिता च्या कुठल्याही योजना न आणता मन की बात करत




देशातील जनतेची फसवणुक करण्याचे काम नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्ष करत असुन वाढलेली महागाई हे या सरकारचे नाकरते पणाचे लक्षण आहे.जर इंधनाचा तुटवडा कमी करून दरवाढ कमी न केल्यास येणाऱ्या काळात बीड जिल्ह्य काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असे आवाहन जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केले.यावेळी प्रवीणकुमार शेप, बाळासाहेब ठोंबरे, दादासाहेब मुंडे,गणेश राऊत,गणेश बजगुडे, महावीर मस्के,परवेज कुरेशी,मीनाक्षी ताई पांडुळे,दत्ता कांबळे, संभाजी जाधव,प्रकाश मुंडे,राहुल जाधव,प्रवीण खोडसे,सय्यद फारुख, आकाश गायकवाड, शिवाजी कोटुळे,शिवाजी देशमुख,इलियास टेलर, शेख मोहसिन,शेख अमर,गणेश कारंडे,शेख नौशाद,अशोक केदार, अशोक बहिरवाल, विशाल मस्के,हरिभाऊ सावंत,राम शेळके,शेख मुशर्रफ,अविनाश दरपे, उद्धव जोगदंड,विजय पवार,कल्याण टेकाळे, विष्णू मस्के,मनोहर गीते, शेख जाहीर,शाम मुंडे, दीपक कराड,जमील खान यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# धारूर तालुक्याला मिळाले पाच हजार लिटर ५० टक्के दुकानदारांना रॉकेल मिळाले नाही पुरवठा विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

धारूर । प्रतिनिधी

अनेक वर्षांनंतर प्रथमच गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर धारूर तालुक्यासाठी आलेल्या पाच हजार लिटर रॉकेलच्या वाटपावर आता संशयाचे सावट निर्माण झाले आहे. शासनाकडून आलेल्या या रॉकेलचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळणे अपेक्षित असताना, तब्बल ५० टक्के रेशन दुकानदारांनी रॉकेल नेले नसल्याची माहिती समोर आली आहे . त्यामुळे उर्वरित रॉकेल नेमके कुठे गेले, असा प्रश्न उपस्थित होत असून काळ्या बाजाराचा वास येत असल्याची चर्चा तालुक्यात सुरू झाली आहे.

धारूर तालुक्यात एकूण १२४ रेशन दुकाने आहेत. शासनाच्या नियोजनानुसार प्रथम येणाऱ्या कार्डधारकांना प्रति कार्ड तीन लिटर रॉकेल देण्यात येणार होते. यासाठी प्रति लिटर ६५ रुपये दर निश्चित करण्यात आला होता. अनेक वर्षांनंतर रॉकेल उपलब्ध झाल्याने नागरिकांमध्ये उत्सुकता होती. मात्र अनेक दुकानदारांकडे रॉकेल पोहोचलेच नसल्याने नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागल्याचे चित्र दिसून आले.

विशेष म्हणजे, ज्या दुकानदारांना रॉकेल मिळाले नाही परंतु रवठा विभागाकडे किंवा वरिष्ठ अधिकार्याकडे ते तक्रारही करू शकत नाहीत कारण तक्रार केल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याचा उगारला जातो यामुळे तेही उघडपणे बोलत नाही .

यासंदर्भात धारूर पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार नारायण काकडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी मी माहिती घेऊन सांगतो, असे सांगत वेळ मारून नेल्याची प्रतिक्रिया संबंधितांनी व्यक्त केली. तर विभागाचे गोदाम रक्षक कपिल गोडसे यांनी पाच हजार लिटर रॉकेल आले होते, मात्र वाटपासंदर्भातील माहिती नायब तहसीलदार काकडे यांनाच विचारावी, असे सांगत उडवाउडवीची उत्तरे दिली.धक्कादायक बाब म्हणजे, नायब तहसीलदार तसेच गोदाम रक्षक या दोघांनाही संबंधित रॉकेल कोणत्या डिलरमार्फत वितरित करण्यात आले, याची स्पष्ट माहिती देता आली नाही. त्यामुळे पुरवठा विभागातील समन्वयाचा अभाव की काहीतरी वेगळाच प्रकार, असा सवाल उपस्थित होत आहे.दरम्यान, अनेक वर्षांनंतर आलेल्या रॉकेलचे नियोजनबद्ध वाटप होणे अपेक्षित असताना त्यात मोठ्या प्रमाणात अनागोंदी दिसून येत आहे. तालुक्यातील अनेक कार्डधारकांना रॉकेल न मिळाल्यामुळे त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला आहे . या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली जात असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून संबंधित जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे .

या संदर्भात नायब तहसीलदार सुरेश पाळदे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी रॉकेल वाटपाचे टँकर आले होते .अनेक दुकानदारांनी रॉकील नेले परंतु काही दुकानदार रॉकेल नेण्यासाठी आले नाहीत .त्यांना व्हाट्सअप ग्रुप वरही सूचना देण्यात आली होती तरीही ते आले नाहीत असेही त्यांनी सांगितले

# अंबड तालुक्यात भीषण अपघात रामनगर पाटीजवळ अज्ञात इसमाचा मृत्यू

## पोलिसांकडून ओळख पटवण्याचे आवाहन

अंबड ।प्रतिनिधी

अंबड-जालना रस्त्यावरील रामनगर पाटीजवळ आज सकाळी एका अज्ञात वाहनाच्या धडकेत एका ३५ ते ४० वर्षे वयाच्या पुरुषाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या प्रकरणी अंबड पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून मृतदेहाची ओळख पटवण्याचे आवाहन नागरिकांना केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार आज दि. ३० मे २०२६ रोजी सकाळी अंदाजे ६:३० वाजेच्या सुमारास रामनगर पाटी ता.अंबड जि. जालना येथे एका अज्ञात पुरुषाचा रोड अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच उपजिल्हा रुग्णालय अंबड येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पोलिसांना मृत एम.एल.सी. पाठवून



याबाबत अवगत केले. डॉक्टरांनी तपासणी अंती सदर इसमास मृत घोषित केले.अंबड पोलीस ठाण्यात याप्रकरणी आ.मृ.नं. ४७/२०२६ कलम १९४ बी.एन.एस.एस. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस स्वतः या प्रकरणाचा कसून तपास करत आहेत.मृत इसमाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे

वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे उंची ५ फूट ३ इंच वर्ण काळा सावळा केस काळे पांढरे ओळख पटवणारी खूण छातीवर डाव्या बाजूस 'तिळ' आहे.पोशाख अंगात फिकट काळसर रंगाचे टी-शर्ट,भुरकट रंगाची नाईटपॅन्ट,निळ्या रंगाची अंडरवेअर आणि कमरेला लाल रंगाचा करदोडा बांधलेला आहे.

पोलीसांचे आवाहन

सध्या सदर मृतदेह ओळख पटवण्यासाठी घाटी दवाखाना जालना येथील शीतगृहात ठेवण्यात आला आहे. वरील वर्णनाचा किंवा पोशाखाचा कोणताही माणूस आपल्या माहितीत असल्यास अथवा बेपत्ता असल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन अंबड पोलिसांकडून करण्यात आले आहे.

संपर्क अधिकारी पो.नि.एस.ए.घोडके पो.स्टे. अंबड जिल्हा जालना मो.नं. ९ ६ ५ ७ ४ ७ ८ ० ० ३ पो.उप.नि.एस.आर.बागलाने पो.स्टे.अंबड जिल्हा जालना मो.नं. ९५१८९३८३२९ आपल्या भागात अशी कोणतीही व्यक्ती बेपत्ता असल्यास कृपया वरील क्रमांकावर त्वरित संपर्क साधून पोलिसांना सहकार्य करावे.

# अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना येथे ऊस तोडणी वाहतूक कराराचा शुभारंभ

अंबाजोगाई (प्रतिनिधी) अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना ली अबांसाखर च्या आगामी गळीत हंगाम २०२६२०२७ हंगामा करिता ऊस तोडणी वाहतुकीच्या कराराचा शुभारंभ कारखान्याचे व्हाईस चेअरमन दत्तात्रय (आबा) पाटील यांच्या शुभहस्ते व कार्यकारी संचालक डि एन मरकड , संचालक एस बी साखरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर यांच्या नेतृत्वात कारखान्याची यशस्वी वाटचाल सुरू असल्याचे व्हा.चेअरमन श्री दत्तात्रय आबा पाटील यांनी सांगितले. आगामी गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी आवश्यक ती तोडणी वाहतूक यंत्रणा करारबद्ध करावी, हंगामात जास्तीत जास्त यंत्रणा हजर राहावी ,ऊस पुरवठादार शेतकरी सभासद यांचा नोंद



झालेला संपूर्ण ऊस कारखान्याला गाळपास आला पाहिजे.याकडे संबंधित यंत्रणेने काटेकोरपणे लक्ष द्यावे अशा सूचना व्हाईस चेअरमन दत्तात्रय आबा पाटील यांनी दिल्या. तर कारखान्याचे कार्यकारी संचालक डि एन मरकड यांनी ऊस तोडणी मजुरांचा वाढता प्रश्न विचारात घेऊन चालू हंगामाकरीता जादा ऊस तोडणी मशीनची आवश्यकता असल्याचे सांगितले.

यावेळी संचालक एस बी साखरे, मुख्य शेतकी अधिकारी सचिन बागल,,ऊस पुरवठा अधिकारी केशव खराबे,ॲग्री ओव्हर सिअर रजिंति मुठाळ, यांचेसह कारखान्याचे सर्व अधिकारी, कर्मचारी व ऊस तोडणी ठेकेदार बहुसंख्येने उपस्थित होते.

# सावळी अंगणवाडी परीसरात घाणीचे साम्राज्य,ग्रामपंचायतीचे अक्षम्य दुर्लक्ष

बिलोली तालूक्यातील मौ.सावळी येथील अंगणवाडी (४) या परिसरात झाडी-झुडूपांनीं विळखा घातला आहे आणि यासह गावातील संपूर्ण नाल्या कचऱ्याने तुडुंब भरलेल्या असून यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे.याबद्दल सामाजिक कार्यकर्ते शेख महेमूद सावळीकर व सावळी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे अनेक तक्रारी दिल्या आहेत तरीही संबंधित सरपंच, ग्रामसेवकाचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष होताना दिसून येत आहे.

गाव स्वच्छतासह शाळा, अंगणवाडी यासाठी शासन स्तरावरून पंदरावित्त आयोगासह विविध योजने अंतर्गत ग्रामपंचायच्या विविध कामाच्या आराखड्यानुसार लाखो रुपयांचा निधी पुरवीला जातो, परंतु गावचे सरपंच,ग्रामसेवक हे कामाची गुत्तेदारी व टक्केवारीच्या मोहात आडकल्यामुळे गावातील पायभूत आणि मूलभूत गर्जेच्या कामाकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे.असाच प्रकार बिलोली तालुक्यातील मौ. सावळी ग्रामपंचायत



मध्ये चालू आहे. या गावच्या गल्ली,बोळीतील नाल्या कचऱ्याने पूर्ण तुंबल्या असून त्यात जमलेल्या घाणीच्या पाण्याने गावात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत आहे. यापाठोपाठ गावातील क्रमांक चारची अंगणवाडीतर अक्षरशः घाणीच्या साम्राज्यासह झाडी, झुडूपांच्या विळाख्यात आडकली आहे. यामुळे लाहान, बालकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे. म्हणून अंगणवाडी परिसरातील अस्वच्छता,तसेच परिसरात वाढलेल्या झाडी -झुडूपांची विल्हेवाट लावण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शेख महेमूद सावळीकर व सावळी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे. परंतु याबद्दल संबंधित सरपंच व ग्रामसेवकाकडून अद्याप कोणती कार्यवाही करण्यात आलेली नाही. म्हणून मुख्यकार्यकारी अधिकारी नांदेड यांनी याकडे लक्ष घालून सावळी ग्रामस्थांना न्याय मिळून देतील का....?अशी अपेक्षा सावळी ग्रामस्थामध्ये बाळगवली आहे.

# मध्यवर्ती बँकेच्या मतदार यादी प्रकरणी होटाळकरांचे नाव समाविष्ट करा

## विभागीय सहनिबंधकांचे आदेश निवडणूक यंत्रणेवर प्रश्नचिन्

नायगाव तालुक्यातील व नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत मतदार यादीवरून निर्माण झालेला वाद आता अधिकच गडद झाला असून, होटाळा (ता. नायगाव) येथील सेवा सहकारी संस्थेचे प्रतिनिधी तथा माजी संचालक शिवराज पाटील होटाळकर यांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. विभागीय सहनिबंधक (लातूर) तथा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्याचे आदेश देत निवडणूक यंत्रणेलाच अप्रत्यक्षपणे चपराक लगावल्याची चर्चा सहकार वर्तुळात रंगू लागली आहे.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान प्रारूप मतदार यादी जाहीर करण्यात आली होती. मात्र, संस्थेच्या प्रतिनिधी म्हणून वैध नियुक्ती असतानाही शिवराज पाटील होटाळकर यांचे नाव मतदार यादीतून वगळण्यात आल्याने मोठा वाद निर्माण झाला होता.

या प्रकारामुळे सहकार क्षेत्रात संतापाची लाट उसळली होती. संबंधित निर्णयाविरोधात होटाळकर यांनी अधिकृत हरकती नोंदवत आवश्यक पुरावे आणि कागदपत्रे निवडणूक अधिकाऱ्यांकडे सादर केली होती.या प्रकरणाची सुनावणी महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ अंतर्गत घेण्यात आली. सुनावणीनंतर विभागीय सहनिबंधकांनी होटाळकर यांची नियुक्ती वैध असल्याचे स्पष्ट मान्य करत त्यांचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्याचे आदेश निवडणूक यंत्रणेला दिले आहेत. या आदेशामुळे निवडणूक प्रक्रियेत झालेल्या कथित त्रुटींवर शिक्कामोर्तब झाल्याचे बोलले जात आहे.दरम्यान, संस्थेच्या ठरावानुसार प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झालेली असतानाही संबंधितांचे नाव गायब होणे ही केवळ प्रशासकीय चूक नसून निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. राजकीय दबावातून काही नावे डावलण्याचा प्रयत्न झाला काय? असा सवालही आता उपस्थित होऊ लागला आहे.

सहकार क्षेत्रातील जाणकारांच्या मते, जिल्हा मध्यवर्ती बँकेसारख्या महत्त्वाच्या संस्थेच्या निवडणुकीत मतदार यादीतील पारदर्शकता अत्यंत महत्त्वाची असते. अशा परिस्थितीत वैध प्रतिनिधीचे नाव वगळले जाणे ही गंभीर बाब मानली जात असून, यामुळे निवडणूक यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या आदेशानंतर सहकार क्षेत्रातील राजकीय समीकरणांनाही वेग आला असून, आगामी निवडणुकीत या प्रकरणाचे पडसाद उमटण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विरोधकांनी या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी पुढे रेटण्याची तयारी सुरू केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# तंबाखूचे वाढते व्यसन : भारत तोंडाच्या कर्करोगाची राजधानी का ठरत आहे? -डॉ.सतीश सोनवणे

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त ३१ मे रोजी तंबाखूच्या वाढत्या व्यसनामुळे निर्माण होणाऱ्या गंभीर आरोग्य समस्यांबाबत जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्याच्या तंबाखू नियंत्रण व कर्करोग जनजागृती समितीचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र कॅन्सर वॉरियर्सचे राज्य समन्वयक डॉ. सतीश सोनवणे यांनी तंबाखूच्या वाढत्या व्यसनामुळे भारत तोंडाच्या कर्करोगाची राजधानी ठरत असल्याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे.




डॉ. सोनवणे यांनी सांगितले की, तंबाखू ही केवळ सवय नसून निकोटीनवर आधारित गंभीर व्यसन आहे. गुटखा, जर्दा, पानमसाला, मावा, सुपारी व इतर तंबाखूजन्य पदार्थांच्या वाढत्या सेवनामुळे भारतात तोंडाच्या कर्करोगाचे प्रमाण झपाट्याने वाढत असून, जगातील तोंडाच्या कर्करोगाच्या रुग्णांपैकी जवळपास एकतृतीयांश रुग्ण भारतात आढळतात. तंबाखूमुळे तोंडातील पेशींना सातत्याने रासायनिक इजा होत राहते. त्यामुळे तोंडात पांढरे किंवा लालसर डाग, न बऱ्या होणाऱ्या जखमा, गाठी, तोंड उघडताना त्रास किंवा अन्न गिळताना वेदना यांसारखी लक्षणे दिसू शकतात. या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास प्री-कॅन्सर अवस्थेचे रूपांतर कर्करोगात होऊ शकते.त्यांनी सांगितले की, भारतात सुमारे २५ कोटी लोक तंबाखूचे सेवन करतात, तर महाराष्ट्रात जवळपास २.५ कोटी लोक तंबाखूच्या व्यसनाधीन आहेत. संशोधनानुसार तोंडाच्या कर्करोगाच्या सुमारे ७० टक्के प्रकरणांचा थेट संबंध तंबाखू सेवनाशी आहे. तंबाखूचे दुष्परिणाम केवळ कर्करोगापुरते मर्यादित नसून धूम्रपानामुळे फुफ्फुसांचे विकार, श्वसनास त्रास, हृदयविकार, उच्च रक्तदाब व पक्षाघाताचा धोकाही वाढतो.

तंबाखू नियंत्रणासाठी जनजागृतीबरोबरच कायद्यांची कठोर अंमलबजावणी, सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानबंदी, तंबाखू उत्पादनांच्या जाहिरातींवर नियंत्रण आणि शाळा-महाविद्यालयांत सातत्यपूर्ण जनजागृती कार्यक्रम राबविणे आवश्यक असल्याचे डॉ. सोनवणे यांनी स्पष्ट केले. तसेच व्यसनमुक्तीसाठी समुपदेशन, वैद्यकीय उपचार व निकोटीन रिप्लेसमेंट थेरपीसारख्या वैज्ञानिक पद्धती प्रभावी ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. आजच्या तरुण पिढीने तंबाखू सेवनाला आधुनिकता किंवा प्रतिष्ठेचे प्रतीक न समजता निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करावा, असे आवाहन करत स्वतःसाठी, कुटुंबासाठी आणि पुढील पिढ्यांच्या सुरक्षित भविष्यासाठी तंबाखूमुक्त जीवनाचा संकल्प करण्याची हीच योग्य वेळ असल्याचे डॉ. सतीश सोनवणे यांनी सांगितले.

# आष्टी येथील विनायकनगर परिसरातील ग्राहकांमध्ये संताप;जीओ कंपनीचा जनरेटर लाईट गेल्यावर बंदच

जिओ प्रशासनाचा भोंगळ कारभार?

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी शहरातील मुर्शदपुर परिसरातील विनायकनगर भागात असलेल्या जिओ मोबाईल टॉवरच्या कामकाजाबाबत नागरिकांनी गंभीर नाराजी व्यक्त केली असून, वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर जनरेटर सुरू न करता तो केवळ दर्शनी स्वरूपात ठेवला जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे परिसरातील मोबाईल नेटवर्क वारंवार खंडित होत असून नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याचे सांगितले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुर्शदपुर येथील विनायकनगर भागातील माँ जिजाऊ साहेब चौक परिसरात जिओ कंपनीचा मोबाईल टॉवर कार्यरत आहे. या टॉवरसाठी वीजपुरवठा खंडित झाल्यास नेटवर्क सेवा सुरळीत ठेवण्यासाठी जनरेटरची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्षात वीज गेल्यानंतर जनरेटर सुरू केला जात नसल्याने परिसरातील नेटवर्क सेवा ठप्प पडते, असा आरोप स्थानिक ग्राहक व नागरिकांनी केला आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, टॉवरजवळ जनरेटर वाहन उभे असले तरी ते केवळ औपचारिकता म्हणून दाखवले जात असून, वीजपुरवठा बंद झाल्यानंतर जनरेटर सुरू करण्याऐवजी बंदच ठेवण्यात येतो.

परिणामी, मुर्शदपुर, विनायकनगर तसेच लगतच्या परिसरात मोबाईल रेंजची गंभीर समस्या निर्माण होत आहे. विशेषतः ऑनलाइन व्यवहार, शासकीय सेवा, मोबाईल बँकिंग, विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अध्ययन, इंटरनेट सेवा तसेच दैनंदिन संपर्क व्यवस्था यावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे नागरिकांनी नमूद केले. गेल्या काही दिवसांपासून वीजपुरवठा खंडित होताच मोबाईल नेटवर्क अचानक गायब होणे, कॉल न लागणे, इंटरनेट बंद पडणे किंवा अत्यंत संथ गतीने सुरू राहणे अशा समस्या सातत्याने जाणवत असल्याचे नागरिकांनी सांगितले. अनेकांनी ग्राहक सेवा केंद्रात तक्रारी केल्या असल्या तरी समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, मोबाईल सेवा देणाऱ्या कंपनीकडून दर्जेदार नेटवर्क सुविधा पुरविण्याचे आश्वासन दिले जाते. मात्र, प्रत्यक्षात जनरेटर उपलब्ध असूनही त्याचा वापर होत नसेल तर हा ग्राहकांची दिशाभूल करणारा प्रकार असल्याचा आरोप करण्यात येत आहे. केवळ वाहन किंवा जनरेटर उभा करून सुविधा उपलब्ध



असल्याचा भास निर्माण करणे आणि प्रत्यक्षात सेवा बंद राहणे ही गंभीर बाब असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर विनायकनगर परिसरातील नागरिकांनी संबंधित जनरेटर चालक व व्यवस्थापनाच्या कामकाजाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर मोबाईल सेवा अखंड सुरू राहण्यासाठी जनरेटर तत्काळ कार्यान्वित करण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, या संदर्भात संबंधित जिओ प्रशासनाची अधिकृत भूमिका समजू शकली नसून, नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन याबाबत स्पष्टीकरण देण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# वारस हक्काच्या जमिनीवरील फेरफार प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांकडे न्यायाची मागणी

किल्ले धारूर । वार्ताहर

धारूर तालुक्यातील तांदळवाडी येथील एका महिलेच्या वारस हक्काच्या जमिनीबाबत कथित बेकायदेशीर फेरफार झाल्याचा आरोप समोर आला असून, या प्रकरणी संबंधित महिलेचे पुत्र सुभाष नामदेव साखरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देत चौकशी व न्यायाची मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अर्जदाराच्या आईच्या नावावरील जमिनीच्या वारस नोंदीमध्ये कथितरित्या फेरफार करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित जमीन व्यवहारात काही व्यक्तींनी संगनमताने चुकीची माहिती सादर करून व्यवहार केल्याचा दावा अर्जदाराने केला आहे. तसेच, संबंधित फेरफार प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली संमती न घेता नोंदी बदलण्यात आल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, वारस नोंदीसाठी आवश्यक असलेल्या सक्सेशन सर्टिफिकेटचा चुकीच्या पद्धतीने वापर करून जमीन हस्तांतरण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात काही महसूल अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, संबंधित फेरफार व जमीन विक्री व्यवहारांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी अर्जदाराने केली आहे.

दरम्यान, सुभाष नामदेव साखरे यांनी आपल्या आईचा वारस हक्क अबाधित ठेवून संबंधित जमीन व्यवहार रद्द करण्यात यावेत तसेच दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.या प्रकरणाची प्रशासनाकडून काय दखल घेतली जाते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.



# शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांना निवेदन देण्यासाठी येणाऱ्या गफूर सय्यद चे हृदयविकाराच्या धक्याने निधन


केज/प्रतिनिधी

शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या शिव संवाद मराठवाडा दौरा सुरू असून शुक्रवार रोजी केज येथे त्यांनी आढावा बैठक घेतली. बैठकीपूर्वी त्यांनी दहा दिवसांपूर्वी मुलाचे निधन झाल्याने रसुल गफूर सय्यद हे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना निवेदन देण्यासाठी जात असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला.त्यांना तातडीनं केज येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान रसूल सय्यद यांचे दुर्दैवी निधन झाले.

या घटनेची माहिती मिळताच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी रसूल सय्यद यांच्या घरी जाऊन कुटुंबियांची भेट घेवून त्यांचे सांत्वन केले. यावेळी मंत्री भरत शेठ गोगावले,खासदार संदीपान भुमरे,माजी आमदार प्रा.सौ.संगीता ठोंबरे,युवा सेना निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या सह शिवसैनिक उपस्थित होते.

पाच लाखाची मदत...

या भेटी दरम्यान खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी रसूल गफूर सय्यद यांच्या कुटुंबीयांना पाच लाखांची मदत दिली.तसेच रसूल गफूर सय्यद यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी शिवसेना घेईल,असे त्यांनी त्यांच्या कुटुंबियांना आश्वासन दिले.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आईच्या नावावर काळीमा संपत्तीसाठी पोटच्या मुलालाच नाकारले अंबड तालुक्यातील धक्कादायक प्रकार

## गट नं. ३५५ मधील प्रकार दुय्यम निबंधक कार्यालयाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह दोषींवर गुन्हे दाखल करून निलंबनाची सामाजिक कार्यकर्त्याची महसूलमंत्र्यांकडे मागणी

अंबड ।प्रतिनिधी

माता न कसाई या उक्तीचा प्रत्यय आणून देणारी आणि संपूर्ण मानवतेला काळिमा फासणारी अत्यंत संतापजनक व धक्कादायक घटना अंबड तालुक्यातील भनंग जळगाव येथे उघडकीस आली आहे. केवळ अफाट संपत्तीच्या आणि पैशाच्या हव्यासापोटी एका जन्मदात्या आईने आपल्या तीन मुलांपैकी एका पोटच्या मुलाला थेट नाकारत मला दोनच मुले आहेत असे लिहून देत कोट्यवधी रुपयांचे रजिस्टर वाटणीपत्र करून घेतल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या फसवणुकीत दुय्यम निबंधक कार्यालयातील रजिस्ट्री ऑफिस अधिकाऱ्यांनी कोणतीही कायदेशीर पडताळणी न करता आर्थिक देवाणघेवाण करून हे बेकायदेशीर वाटणीपत्र नोंदविल्याचा आरोप होत आहे. याप्रकरणी पीडित वारसाने तहसीलदारांकडे धाव घेत फेरफारवर आक्षेप घेतला असून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

भनंग जळगाव येथील गट नं. ३५५ मध्ये आई आणि तीन वारसांची नावे सातबारा व फेरफार उताऱ्यावर मालकी हक्क म्हणून रीतसर नोंदवलेली आहेत. कायद्यानुसार या जमिनीवर तिन्ही भावांचा समान हक्क आहे. मात्र संबंधित आई चंद्रकला गुलाब तायडे हिने इतर दोन मुलांशी संगनमत करून तिसरा मुलगा नवनाथ गुलाब तायडे याला संपत्तीतून बेदखल करण्याचा कट रचला. या कटकारस्थानांतर्गत स्वतःच्या आईने नोंदणीकृत वाटणीपत्र करताना शासकीय दस्तऐवजात मला दोनच मुले आहेत असे असत्य व बनावट प्रतिपादन केले आणि तिसऱ्या मुलाचे अस्तित्वच नाकारले.

रजिस्टर अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर संशय नियमांना हरताळ

या संपूर्ण प्रकरणात अंबड येथील दुय्यम निबंधक कार्यालयाचा कारभार तीव्र संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. कायदेशीर नियमांनुसार कोणत्याही मालमत्तेचे वाटणीपत्र किंवा हस्तांतरण करताना अधिकृत वारस प्रमाणपत्र किंवा कौटुंबिक पार्श्वभूमीची पडताळणी करणे बंधनकारक असते. मात्र येथील रजिस्ट्री अधिकाऱ्यांनी कसलीही खातरजमा न करता केवळ कथित आर्थिक देवाणघेवाण आणि जास्तीचे पैसे लाटल्यामुळे डोळे झाकून या बेकायदेशीर वाटणीपत्राची नोंदणी केली. शासकीय खुर्चीवर बसून कर्तव्यात कसूर करणाऱ्या या अधिकाऱ्यांमुळेच एका खऱ्या वारसावर रस्त्यावर येण्याची वेळ आली आहे.

पीडित भावाची महसूल दरबारी धाव, फेर अडवला

आपल्याच आईने आणि भावांनी विश्वासघात करून हक्काच्या जमिनीतून बेदखल केल्याचे समजताच पीडित वारस नवनाथ गुलाब तायडे यांनी तात्काळ अंबड तहसील कार्यालय गाठून या फसवणुकीच्या आधारे होऊ पाहणारा फेरफार रोखण्यासाठी कायदेशीर आक्षेप नोंदवला आहे. न्यायासाठी त्यांनी महसूल प्रशासनाकडे दाद मागितली असून फसवणूक करणारी आई व दोन्ही भावांवर कडक कायदेशीर कारवाई करून गुन्हे दाखल करण्यासाठी कायदेशीर लढा सुरू केला आहे.

### वरिष्ठ अधिकारी काय कारवाई करणार ?

तालुक्यात खळबळ उडवून देणाऱ्या या मदर इंडिया प्रकरणाची चर्चा आता जिल्हाभर सुरू आहे. महसूल विभागाच्या नाकाखाली एवढा मोठा घोटाळा आणि फसवणूक होत असताना वरिष्ठ महसूल अधिकारी यावर काय पावले उचलतात पोलीस प्रशासनाकडून गुन्हे कधी दाखल होतात आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर निलंबनाची कुऱ्हाड कोसळते का ? याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

दोषी अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करा- पंकज मंडलिक सामाजिक कार्यकर्ते

या गंभीर प्रकरणावर तीव्र संताप व्यक्त करत जामखेड येथील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते पंकज मंडलिक यांनी थेट महसूलमंत्र्यांकडे कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की

आईला सर्व लेकरे सारखी असतात ही जुनी म्हण भनंग जळगावच्या या घटनेने खोटी ठरवली असून आईच्या पवित्र नावाला काळिमा फासला आहे. केवळ संपत्तीसाठी एका जिवंत मुलाला कागदोपत्री मारण्याचे पातक या आईने आणि दोन भावांनी केले आहे. याहून गंभीर बाब म्हणजे दुय्यम निबंधक अधिकाऱ्यांनी कोणतीही कायदेशीर कागदपत्रे आणि वारस प्रमाणपत्र न पाहता हे वाटणीपत्र मंजूर कसे केले ? हा सरळ-सरळ भ्रष्टाचाराचा आणि पदाचा गैरवापर करण्याचा प्रकार आहे. मी राज्याचे महसूलमंत्री नामदार बावनकुळे साहेब यांना विनंती व मागणी करतो की या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी रजिस्ट्री अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करण्यात यावे आणि फसवणूक करणाऱ्या आई व दोन्ही भावांवर तात्काळ गुन्हे दाखल करून पीडित नवनाथ तायडे यांना न्याय मिळवून द्यावा.

# अहिल्यादेवी जयंती महोत्सवाची जय्यत तयारी

## जामखेडमध्ये दोन दिवस विविध कार्यक्रम

जामखेड ।विलास जाधव

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त अंबड तालुक्यातील जामखेड येथे ३१ मे व १ जून रोजी भव्य जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून त्यासाठी जय्यत तयारी सुरू आहे. अहिल्यादेवी होळकर समिती व समस्त धनगर बांधवांच्या वतीने आयोजित या महोत्सवात सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.



महोत्सवाची सुरुवात ३१ मे रोजी सकाळी प्रतिमापूजनाने होणार आहे. त्यानंतर दिवसभर भव्य आरोग्य शिबिर, महाप्रसाद कार्यक्रम, वक्तृत्व स्पर्धा तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार होणार आहे. समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.दरम्यान, १ जून रोजी सायंकाळी ४ ते रात्री १० वाजेपर्यंत भव्य मिरवणूक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. पारंपरिक वाद्यांचा निनाद, पिवळ्या पताकांची दिमाखदार सजावट आणि मोठ्या संख्येने सहभागी होणारे समाजबांधव यामुळे जामखेड मध्ये उत्सवी वातावरण निर्माण होणार आहे.अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचा आदर्श पुढील पिढीसमोर ठेवण्याच्या उद्देशाने हा जयंती महोत्सव साजरा करण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले. महोत्सवात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या शिवसंवाद दौऱ्यानिमित्त पाटोदा भगवामय




## भल्याभल्यांना जमले नाही ते राहुल भैय्या चौरे यांनी करून दाखवले

पाटोदा (प्रतिनिधी ) शिवसेनेचे युवा नेते व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या शिवसंवाद दौऱ्यानिमित्त पाटोदा शहर भगवामय झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. शहरातील प्रमुख चौक, रस्ते, स्वागत कमानी, भगवे झेंडे व बॅनरमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून दौऱ्याची तालुकाभर जोरदार चर्चा सुरू आहे.यावेळी पाटोदा येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या शिवसेना कार्यालयाचे उद्घाटनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यालय उद्घाटन सोहळ्यासाठी शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होती. भगव्या झेंड्यांनी सजलेले कार्यालय परिसर आकर्षणाचे केंद्र ठरले.विशेष म्हणजे तालुका प्रमुख पदाची जबाबदारी सांभाळत असताना राहुल भैय्या चौरे यांनी पाटोद्यात खासदार व मंत्री दर्जाचे नेते आणून स्वतःची राजकीय ताकद दाखवून दिली .अनेकांना जे शक्य झाले नाही ते राहुल भैय्या चौरे यांनी करून दाखविल्याने शिवसैनिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.शिवसंवाद दौऱ्यासाठी तालुक्यात मोठ्या प्रमाणात नियोजन करण्यात आले होते. विविध गावांमधून आलेल्या शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. युवकांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. शहरात ठिकठिकाणी स्वागत फलक लावण्यात आले होते.या दौऱ्यामुळे पाटोदा तालुक्यात शिवसेनेची ताकद पुन्हा एकदा दिसून आली असून आगामी स्थानिक राजकारणात राहुल भैय्या चौरे यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

# माजलगावात राजमाता अहिल्याबाई होळकर जन्मोत्सवाचे आयोजन

## पिवळ्या ध्वजाचे ध्वजारोहण महिलांच्या हस्ते महाआरती व अभिवादन सभा

माजलगाव (प्रतिनिधी )सकल धनगर समाज, माजलगाव विधानसभा मतदारसंघ यांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा कार्यक्रम दिनांक ३१ मे रोजी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.



या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक येथे पिवळ्या ध्वजाच्या ध्वजारोहणाने होणार असून हा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होईल. त्यानंतर सकाळी १० वाजता समाजातील महिलांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महाआरती तसेच अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात समाजातील महिला भगिनींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून भाजपा विधानसभा प्रमुख माधव निर्मळ हे उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले हे राहणार आहेत. विशेष उपस्थिती म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश गवते, सरपंच राज अर्जुन, सरपंच नारायण भले उपस्थित राहतील.

तसेच प्रमुख अतिथी म्हणून बंडू खांडेकर, ज्ञानेश्वर सरवदे, यशवंत गायके, अण्णासाहेब वगरे, अशोकराव डोणे, बबनराव सरवदे, भगवानराव सरवदे, ॲड. विनायकराव लवटे, सुभाषराव गडदे, डॉ. भारत वाघमोडे, लक्ष्मीकांत सोन्नर, नारायण सातपुते, मुक्तीराम आबुज, संजय धरपडे, बाळासाहेब सोनसळे, ह.भ.प.शिवाजी महाराज गडदे, विशाल देवकते, संपतराव हराळ, भागवत गायकवाड ,ॲड.जयराम सजगणे, रणजीत रुपनर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या जन्मोत्सव सोहळ्यास माजलगाव मतदार संघातील नागरिकांनी व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संयोजक विलास नेमाने, संतोष देवकते, जयंत अध्यक्ष अशोक चोरमले, रामेश्वर शिंदे, रणजीत चोरमले, सुरेश देवकते, आप्पासाहेब तायडे, प्रथमेश बोरखडे, अशोक देवकते, अर्जुन भुतकर, हनुमान गावडे, हरिचंद्र कुंडकर, गणेश हजारे, दत्ता मुळे, दिगंबर घुमरे, अनिल आवाड, अर्जुन दिवटे, सुभाष गवळी, अशोक गवळी, हनुमान बाबरे, रामेश्वर काळे, सचिन वगरे, रामेश्वर सरवदे यांनी केले आहे.

# श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड मंदिर जीर्णोद्धारासाठी आ.सुहास कांदे व आ.नितीन पवार यांची प्रत्येकी दहा लाखांची देणगी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) नाथ संप्रदायाचे प्रमुख श्रद्धास्थान म्हणून ओळख असलेल्या श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे सुरू असलेल्या मंदिर जीर्णोद्धार व विकासकामांना लोकप्रतिनिधी आणि भाविकांकडून मोठ्या प्रमाणात सहकार्य मिळत असून, या पवित्र कार्यासाठी आमदार सुहास कांदे व आमदार नितीन पवार यांनी प्रत्येकी दहा लाख रुपयांची देणगी जाहीर करून भक्तीभावातून मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या आर्थिक सहाय्यामुळे मंदिर विकासकामांना मोठी चालना मिळणार असल्याचे सांगितले जात आहे.

नाथ संप्रदायातील अत्यंत पवित्र आणि ऐतिहासिक धार्मिक स्थळ म्हणून श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाची ओळख आहे. दररोज राज्याच्या विविध भागांतून हजारो भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. अध्यात्म, श्रद्धा आणि धार्मिक परंपरेचे केंद्र म्हणून या गडाचे विशेष महत्त्व आहे. गडावरील मंदिराच्या जीर्ण अवस्थेचा विचार करून मंदिराचा जीर्णोद्धार, परिसर सुशोभीकरण, धार्मिक वारसा संवर्धन तसेच भाविकांना अधिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत.

मंदिर परिसरात सध्या सभामंडप उभारणी, मंदिर दुरुस्ती, भाविकांसाठी निवारा व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छता व परिसर विकास अशा अनेक कामांना वेगाने सुरुवात करण्यात आली आहे. भाविकांच्या वाढत्या संख्येचा विचार करून अधिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी मंदिर देवस्थान ट्रस्टकडून नियोजनबद्ध पद्धतीने विकास आराखडा राबविण्यात येत आहे.

या विकासकामांना हातभार लावत आमदार सुहास कांदे यांनी मंदिरासाठी दहा लाख रुपयांची देणगी दिली. यावेळी त्यांनी, मच्छिंद्रनाथ गड हे श्रद्धा, अध्यात्म आणि सांस्कृतिक परंपरेचे केंद्र आहे. अशा पवित्र धार्मिक स्थळाच्या विकासासाठी योगदान देण्याची संधी मिळणे हे माझ्यासाठी भाग्याचे आहे, अशी भावना व्यक्त केली. धार्मिक स्थळांचा विकास होणे म्हणजे केवळ वास्तूंचा विकास नसून सांस्कृतिक परंपरा जतन करण्याचे कार्य असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्याचप्रमाणे आमदार नितीन पवार यांनीदेखील गडाच्या धार्मिक व




ऐतिहासिक महत्त्वाचा उल्लेख करत मंदिर विकासासाठी आपले सहकार्य भविष्यातही कायम राहील, अशी ग्वाही दिली. त्यांनी दिलेली दहा लाख रुपयांची देणगी मंदिर जीर्णोद्धाराच्या कामात महत्त्वपूर्ण ठरणार असून भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

मच्छिंद्रनाथ गडावरील सुरू असलेल्या विकासकामांसाठी स्थानिक ग्रामस्थ, भक्तगण, सामाजिक संस्था तसेच दानशूर व्यक्तींकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गडाचा धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी सर्व स्तरांतून सहकार्य मिळत असल्यामुळे विकासकामांना गती मिळत आहे. आमदार सुहास कांदे आणि आमदार नितीन पवार यांनी दिलेल्या देणगीबद्दल मंदिर देवस्थान ट्रस्ट, ग्रामस्थ व भाविकांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. त्यांच्या या योगदानामुळे मंदिर विकासकामांना अधिक वेग मिळून भविष्यात श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड भाविकांसाठी अधिक सुविधा-संपन्न धार्मिक स्थळ म्हणून विकसित होईल, अशी भावना व्यक्त केली जात आहे.




# श्री महालक्ष्मी प्रतिष्ठान मार्फत एक महिन्याचे कॉस्मेटोलॉजी प्रशिक्षण संपन्न

केज/प्रतिनिधी

दि.२९ मे २०२६ रोजी श्री महालक्ष्मी प्रतिष्ठान मार्फत पायल ब्युटी पार्लर केज येथे एक महिन्याचे कॉस्मेटोलॉजी प्रशिक्षण तरुण उद्योजक मुली व महिलांसाठी घेण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन श्री महालक्ष्मी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा श्रीमती संगीता इंगोले मॅडम व सचिव श्री.जी.बी.चौधरी सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून पायल ब्युटी पार्लरच्या प्रो.प्रा. सायरा सय्यद मॅडम यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले यात त्यांनी कॉस्मेटोलॉजी म्हणजे ब्युटी पार्लर मध्ये असलेल्या विविध ट्रेनिंग फेशियल,ब्लिचिंग, क्लीनअप सारख्या विविध प्रकारच्या ट्रेनिंग चालू असलेल्या प्रशिक्षणा मधील प्रशिक्षणार्थींना सखोल सराव घेऊन शिकवले व कॉस्मेटोलॉजी हे भविष्यात नवीन उद्योजकांसाठी व्यवसायाचे एक साधन बनू शकते हे स्वतःच्या उदाहरणातून समजावून सांगितले.श्री जी.बी. चौधरी सर यांनी तरुण उद्योजकांसाठी शासना च्या असलेल्या विविध योजनांचे सखोल मार्गदर्शन उपस्थित असलेल्या प्रशिक्षणार्थींना केले.

हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी समुपदेशक कु.तृप्ती शिंदे व सर्व प्रशिक्षणार्थींनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन केले.या कार्यक्रमास प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.या कार्यक्रमात मोलाचे मार्गदर्शन केल्याबद्दल श्री महालक्ष्मी प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष कोषाध्यक्ष व सदस्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

# आज आष्टीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन व अभिवादन सोहळा





### मोठ्या संख्येने उपस्थित रहावे- मा.जि.प.अध्यक्ष डॉ.शिवाजी राऊत

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त रविवार, दि. ३१ मे २०२६ रोजी आष्टी शहरात प्रतिमा पूजन व अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. सालाबादप्रमाणे यंदाही हा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरा होणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या न्यायप्रिय, लोककल्याणकारी आणि धर्मसंवर्धनाच्या कार्यातून इतिहासात अजरामर स्थान मिळविले आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा समाजाला सतत मार्गदर्शक ठरत असल्याने राज्यभरात त्यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम, व्याख्याने, मिरवणुका व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. विशेषतः अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीक्षेत्र चौंडी येथे जयंती उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. त्याच अनुषंगाने आष्टी शहरातही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

आष्टी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक (गणपती मंदिराजवळ, लिमटाका, नगर-बीड रोड, आष्टी) येथे आज रविवार, दि. ३१ मे रोजी सकाळी ९ वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात सामाजिक सलोखा, प्रेरणादायी विचार आणि ऐतिहासिक वारशाचे स्मरण यावर भर देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

यावेळी आ. सुरेश आण्णा धस, माजी आ. भीमरावजी धोंडे साहेब, माजी आ. साहेबरावजी दरेकर नाना, माजी आ. बाळासाहेब आजबे काका, माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास आबा धस तसेच सतीश आबा शिंदे यांच्यासह राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, व्यापारी, पत्रकार, शेतकरी, वैद्यकीय आणि बांधकाम क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. शिवाजी राऊत यांनी आयोजकांच्या वतीने आष्टी शहरासह तालुक्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रेमी नागरिकांनी या प्रतिमा पूजन व अभिवादन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन केले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या आदर्श कार्याची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचावी, समाजात ऐतिहासिक वारशाविषयी जागरूकता निर्माण व्हावी आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत व्हावे, या उद्देशाने दरवर्षी हा कार्यक्रम उत्साहात साजरा केला जात असून यंदाही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# जालना पोलिसांचा थर्ड आय ऑन ड्युटी १२ लाखांचा टाटा
# ट्रक चोरणारे दोन अट्टल चोरटे केवळ २ तासांत जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कामगिरी पोलिसांच्या सुपरफास्ट क्शनने गुन्हेगारी जगतात खळबळ

जालना शेख फारुक :- दि ३० मे २०२६ जालना जिल्ह्यात आता गुन्हेगारांना पळता भुई थोडी झाली आहे भरदिवसा टाटा ट्रक चोरून पसार होणाऱ्या दोन अट्टल चोरट्यांच्या मुसक्या आवळण्यात जालना स्थानिक गुन्हे शाखेला अवघ्या दोन तासांत यश आले आहे. पोलिसांच्या या सिंघम स्टाईल सुपरफास्ट कामगिरीमुळे चोरट्यांचे धाबे दणाणले असून गुन्हेगारी वर्तुळात तीव्र खळबळ माजली आहे.भरदिवसा धाडसी चोरी आणि पोलिसांचे मिशन ट्रेस पुणे जिल्ह्यातील धायरी येथील रहिवासी रवींद्र नामदेव धनावडे वय ४७ वर्षे यांचा १२ लाख रुपये किमतीचा टाटा ट्रक क्र.चक-११-ऊऊ-३५७७ जालना येथील मंगलमूर्ती ट्रान्सपोर्ट हिरो होंडा शोरुमच्या मागून २९ मे २०२६ रोजी दुपारी ४:०० वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी लंपास केला होता.याप्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच पोलिसांची चक्रे वेगाने फिरली.

घटनेचे गांभीर्य ओळखून जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री.तेघबीर सिंह संधू यांनी तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व त्यांच्या पथकाला आरोपींचा छडा लावण्याचे थेट आदेश दिले.

गुन्हेगारांनी कितीही हुशारी दाखवली तरी पोलिसांचे हात त्यांच्यापर्यंत पोहोचायला वेळ लागत नाही गुप्त बातमीदार अन् तांत्रिक तपासाचा सिक्सर आदेश मिळताच एलसीबीच्या पथकाने तपासाची सूत्रे वेगाने हलवली.आधुनिक तंत्रज्ञान आणि गुप्त बातमीदारांचे जाळे सक्रिय करण्यात आले. तांत्रिक तपासाच्या बळावर पोलिसांनी आरोपींचा अचूक माग काढला. ट्रक चोरून पळणारे आरोपी घनसावंगी तालुक्याच्या दिशेने जात असल्याची पक्की माहिती मिळताच पोलिसांनी पुढची रणनीती आखली.

घनसावंगीत थरारक फिल्डिंग दोन हायवे रॉबर्स गजाआड

पोलिसांनी अत्यंत फिल्मी स्टाईलने घनसावंगी येथे नाकेबंदी करून पळून जाणारा तो ट्रक अडवला आणि दोन आरोपींना जागीच दबोचले. अटक करण्यात आलेल्या आरोपी दगडू अशोक कोरडे वय ३३ वर्षे व्यवसाय- ड्रायव्हर रा. मुर्ती



ता.घनसावंगी जि.जालना, नारायण आसाराम धोत्रे वय २४ वर्षे व्यवसाय- ड्रायव्हर रा.मुर्ती ता.घनसावंगी जि.जालना या दोन्ही अट्टल चोरट्यांकडून चोरीला गेलेला १२ लाख रुपयांचा ट्रक पोलिसांनी हस्तगत केला असून पुढील कारवाईसाठी आरोपींना चंदनझिरा पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे.

या सिंघम पथकाने गाजवला इंगा ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक श्री.तेघबीर सिंह संधू, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी,आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.अनंत कुलकर्णी यांच्या थेट मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत सामील जांबाज पोलीस पथक

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.पंकज जाधव, सपोनि सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ यांच्यासह पोलीस अंमलदार सागर बाविस्कर,दत्ता वाघुंडे, शिवप्रसाद एखंडे,सतिश श्रीवास,भागवत खरात,कैलास चेके आणि अशोक जाधव यांनी ही उल्लेखनीय कामगिरी केली.जालना पोलिसांच्या या आक्रमक आणि हायस्पीड कारवाईने गुन्हेगारांना स्पष्ट इशारा दिला आहे.चोरट्यांनो सावधान जालना एलसीबी २४ तास ऑन ड्युटी आहे

# प्राचार्य श्री.प्रभाकर ठोंबरे यांचा
# आज भव्य सेवापूर्ती गौरव समारंभ

आष्टी - (एस. राजेंद्र लाड)

तालुक्यातील देऊळगाव घाट येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, आष्टी संचलित श्री ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. ठोंबरे प्रभाकर साहेबराव हे संस्थेतील तब्बल ३६ वर्षांच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवेनंतर सेवानिवृत्त होत असून, त्यांच्या सन्मानार्थ आज रविवार दि. ३१ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता विद्यालय परिसरात भव्य सेवापूर्ती गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकपणे कार्य करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, बौद्धिक व नैतिक विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणारे प्राचार्य प्रभाकर साहेबराव ठोंबरे यांनी आपल्या सेवाकाळात विद्यालयाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिक्षकांमध्ये समन्वय आणि संस्थेच्या सर्वांगीण उभारणीत त्यांनी मोलाचा वाटा उचलला. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे विद्यालयाने परिसरात वेगळी ओळख निर्माण केली असल्याची भावना शिक्षक, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे.

या सेवापूर्ती गौरव समारंभाचे अध्यक्षस्थान शिक्षण महर्षी माजी आ. भीमरावजी धोंडे साहेब, संस्थापक अध्यक्ष, भूषविणार आहेत. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून ह.भ.प. गुरुवर्य भागवत महाराज उंबरेकर (वृद्धेश्वर निवासी) यांची उपस्थिती लाभणार असून, युवा नेते मा. डॉ. अजयदादा धोंडे, सहसचिव शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ व भगिनी संस्था, आष्टी तसेच चेअरमन महेश सहकारी साखर कारखाना, कडा हे उपस्थित राहणार आहेत. याशिवाय मा. श्री. अभयराजे



धोंडे, कोषाध्यक्ष शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ व भगिनी संस्था, आष्टी यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

देऊळगाव घाट परिसरासह आष्टी तालुक्यातील शिक्षणप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, माजी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. प्राचार्य प्रभाकर साहेबराव ठोंबरे यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव, त्यांच्या सेवाभावी वृत्तीचा सन्मान आणि त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा कार्यक्रम विशेष ठरणार असल्याचे सांगण्यात आले. हा सेवापूर्ती गौरव समारंभ श्री ज्ञानेश्वर विद्यालय, देऊळगाव घाट, ता. आष्टी, जि. बीड येथे आयोजित करण्यात आला असून, कार्यक्रमास उपस्थित राहून प्राचार्य प्रभाकर साहेबराव ठोंबरे यांना शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे.

# सोनिमोहाच्या सुपुत्राचा ४१ राष्ट्रीय रायफलमध्ये गौरव; शौर्यपूर्ण सेवेसाठी सन्मानपत्र प्रदान

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील सोनिमोहा गावचे सुपुत्र सुशेन शामराव मुंडे यांनी भारतीय सैन्यातील ४१ राष्ट्रीय रायफलमध्ये अत्यंत निष्ठेने व उत्कृष्ट कामगिरी बजावत गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. देशसेवेच्या कठीण आणि आव्हानात्मक परिस्थितीत त्यांनी दाखविलेल्या धैर्य, शिस्त व कर्तव्यनिष्ठेची दखल घेत कर्नल दीपक नंद्याल, ४१ राष्ट्रीय रायफल यांच्या हस्ते त्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

सीमेवरील जबाबदाऱ्या पार पाडताना सुषेण मुंडे यांनी अत्यंत प्रामाणिकपणे सेवा बजावत वरिष्ठ अधिकाऱ्यांचा विश्वास संपादन केला. त्यांच्या कार्यामुळे केवळ सोनिमोहा गावच नव्हे तर संपूर्ण धारूर तालुक्याचा अभिमान वाढला आहे. सैन्यदलातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानामुळे गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या सन्मानाबद्दल जगदंबा सैनिक ग्रुप तसेच सोनिमोहा ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे



अभिनंदन करण्यात येत असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. देशसेवा हीच खरी पूजा मानून कार्य करणाऱ्या सुषेण मुंडे यांच्या यशामुळे गावातील युवकांनाही सैन्यदलात भरती होण्याची प्रेरणा मिळणार आहे

# जालना पंचायत समितीत भ्रष्टाचाराचा महास्फोट बीडीओ संदीप पवार यांच्यावर करोडोच्या घोटाळ्याचे गंभीर आरोप
## घरकुल, विहीर, जलजीवन ते मनरेगा योजनांत उघड लूट प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदीप पवार यांच्या निलंबनाची जोरदार मागणी

जालना शेख फारुक

जालना पंचायत समिती अंतर्गत भ्रष्टाचाराचा एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला असून प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत तथा गटविकास अधिकारी श्री. संदीप पवार यांच्यावर विविध शासकीय योजनांमध्ये कोट्यवधी रुपयांचा महाघोटाळा आर्थिक अपहार आणि बोगस निधी वाटप केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे या संदर्भात पुराव्यांसह रीतसर तक्रार दाखल करण्यात आली असून गरीबांच्या हक्काच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्या या अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

या गंभीर प्रकरणामुळे जालना जिल्ह्याच्या ग्रामीण भागात प्रशासनाविरोधात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. घोटाळ्याची कुंडली कोणत्या योजनेत कशी झाली लूटतक्रारीत नमूद केल्यानुसार थेट सर्वसामान्यांशी निगडित असलेल्या प्रत्येक कल्याणकारी योजनेला भ्रष्टाचाराची वाळवी लावण्यात आली आहे घरकुलांमध्ये बोगसगिरी चा कळस प्रधानमंत्री आवास, रमाई, शबरी,




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि मोदी आवास योजनेत लाभार्थ्यांकडून हप्ते मंजूर करण्यासाठी रु.८ ते १० हजारांची उघड खंडणी वसूल करण्यात आली. धक्कादायक बाब म्हणजे अनेक गावांत नवीन घरकुले बांधलीच नसताना जुन्याच घरांना केवळ रंगरंगोटी करून बोगस जिओ टॅगिंग द्वारे शासनाचा लाखो रुपयांचा निधी हडप करण्यात आला.

शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक नवीन सिंचन विहीर मंजूर करण्यासाठी आणि पुढील हप्ते खात्यावर जमा करण्यासाठी प्रत्येकी रु.२०,००० रुपयांची लाच मागितली गेली. पैसे न देणाऱ्या गरीब शेतकऱ्यांना जाणीवपूर्वक मानसिक त्रास देण्यात आला. तसेच शरद पवार ग्रामसमृद्धी योजना अंतर्गत गाय गोठा मंजुरीसाठीही प्रति लाभार्थी रु.१०,००० रुपयांची सक्तीची वसुली करण्यात आली.

मनरेगा आणि वित्त आयोगात डल्ला मनरेगा अंतर्गत मजुरांच्या हाताला काम देण्याऐवजी यंत्रांच्या साहाय्याने कामे उरकून घेण्यात आली आणि बोगस मजूर हजेरी पट मस्टर दाखवून शासनाचा निधी लाटण्यात आला. १४ व्या आणि १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून वॉटर फिल्टर,एलईडी दिवे, कचरा कुंड्यांची चढ्या दराने खरेदी करून लाखो रुपयांची कमशिनबाजी करण्यात आल्याचा संशय आहे.

जलजीवन व स्वच्छ भारत मिशनचा बोजवारा हर घर जल चा दावा करणाऱ्या जलजीवन मिशनमध्ये अत्यंत निकृष्ट दर्जाची कामे करून केवळ टक्केवारी कमिशन लाटण्यासाठी ठेकेदारांची बिले मंजूर करण्यात आली. कित्येक गावांत नळजोडणी नसतानाही कामे पूर्ण दाखवली गेली. तर स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वैयक्तिक आणि सार्वजनिक शौचालयांच्या कामात बोगस लाभार्थी दाखवून निधीचा काळाबाजार करण्यात आला.

तर तीव्र आंदोलन आणि उपोषणाचा इशारा

शासकीय निधीचा अक्षरश बाजार मांडणाऱ्या या भ्रष्ट व्यवस्थेची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत उच्चस्तरीय चौकशी झालीच पाहिजे. चौकशीदरम्यान बीडीओ संदीप पवार पदावर राहिल्यास ते पुराव्यांशी छेडछाड करू शकतात त्यामुळे त्यांना तातडीने निलंबित करण्यात यावे अशी आक्रमक मागणी नागरिकांनी केली आहे.

बोगस कागदपत्रांच्या आधारे शासकीय तिजोरीवर दरोडा टाकणारे अधिकारी, कर्मचारी आणि ठेकेदारांची मालमत्ता जप्त करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यासाठी प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. या मुदतीत निष्पक्ष चौकशी सुरू न झाल्यास तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन आणि उपोषण छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.या भ्रष्टाचाराचा बुरखा टरकावण्यासाठी आणि गरीबांना न्याय मिळवून देण्यासाठी विकास पालवे, गणेश मोरे, संजय भालेराव, स्वरूप सानप, बाळू घुगे, संतोष गाढवे, फरहान अन्सारी, अरुण सदावर्ते, रमेश सदावर्ते, मीरा खाडे यांच्यासह जिल्ह्यातील शेकडो नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे धाव घेतली आहे. आता या महाघोटाळ्यावर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी काय कारवाई करतात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# पेपरफुटीविरोधात जालन्यात सम्यक विद्यार्थी आंदोलन आक्रमक
## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र धरणे आंदोलन

जालना प्रतिनिधी :-

परीक्षा पेपरफुटीच्या गंभीर प्रकाराविरोधात आज जालन्यात विद्यार्थ्यांच्या संतापाचा उद्रेक पाहायला मिळाला. सम्यक विद्यार्थी आंदोलन जालना जिल्ह्याच्या वतीने जिल्हाध्यक्ष सूरज सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी शेकडो विद्यार्थ्यांनी सरकारच्या विद्यार्थीविरोधी धोरणांचा घोषणाबाजीतून तीव्र निषेध केला ज्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसर प्रचंड आंदोलनात्मक घोषणांनी दणाणून गेला होता.

सरकारचे धोरण बोथट सूरज सोनवणे यांचा घणाघात

आंदोलनाचे नेतृत्व करताना सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष सूरज सोनवणे यांनी सरकारवर अत्यंत तिखट शब्दांत प्रहार केला. सोनवणे म्हणाले सध्याच्या सरकारकडे विद्यार्थ्यांच्या हिताविषयी कुठलेही ठोस धोरण नाही. जे काही धोरण आहे ते अत्यंत बोथट आणि कुचकामी आहे. छएएढ पेपरफुटीसारखे वारंवार घडणारे प्रकार विद्यार्थ्यांच्या संपूर्ण भविष्यावर कुऱ्हाड चालवणारे आहेत. रात्रं-दिवस अभ्यास करूनही पेपर फुटत असल्यामुळे हताश होऊन विद्यार्थी आत्महत्येसारखा टोकाचा पर्याय निवडत आहेत. या सर्व परिस्थितीला आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांना पूर्णपणे सरकार आणि त्यांचे चुकीचे धोरणच जबाबदार आहे

चौकशी समित्यांचा फार्स आरोपी मोकाट

पुढे बोलताना त्यांनी खाजगी यंत्रणांच्या मनमानीवर बोट ठेवले. विद्यार्थ्यांच्या हितावर आणि भविष्यावर हल्ला करणाऱ्या खाजगी यंत्रणा पेपरफुटीसारखे गंभीर प्रकार घडवून आणतात. मात्र सरकारकडून केवळ कागदावर चौकशी कमिट्या नेमल्या जातात. पुढे मुख्य आरोपी मोकाट सुटतात. या संपूर्ण चक्रात विद्यार्थ्यांचा प्रचंड शारीरिक आणि मानसिक छळ होत आहे. या छळाची जबाबदारी स्वीकारणारा विद्यार्थ्यांचा कोणी वाली आहे की नाही ? असा संतप्त सवाल सोनवणे यांनी यावेळी उपस्थित केला.

मागण्यांचे निवेदन सादर तीव्र आंदोलनाचा इशारा

जर भविष्यात विद्यार्थ्यांच्या हितावर घाला घालणारे असे प्रकार तातडीने थांबले नाहीत तर सम्यक विद्यार्थी आंदोलन संपूर्ण महाराष्ट्रात आणखी तीव्र आणि उग्र स्वरूपाचे आंदोलन करेल असा थेट आणि आक्रमक इशारा सूरज सोनवणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

या आंदोलनात सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष सूरज सोनवणे यांच्यासह सुबोध बुक्कारे, गणेश कांबळे, विशाल म्हस्के, निलेश हिवाळे, अमोल वाहूळ आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. तसेच या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी वंचित बहुजन




आघाडी चे नेते आणि पदाधिकारी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांच्या उमटलेल्या तीव्र प्रतिक्रियांमुळे हे आंदोलन प्रशासनाचे डोळे उघडणारे ठरेल अशी चर्चा आता राजकीय व सामाजिक वर्तुळात सुरू आहे.

# मानूरमधील परिस्थिती नियंत्रणात !
## महसुल ,पोलीस प्रशासनकाडून शांततेचे आवाहन!

मानूर /प्रतिनिधी ह्व

शिरूर कासार तालुक्यातील श्रीक्षेत्र नागनाथ संस्थान मठामुळे महाराष्ट्र व बाहेर राज्यात श्रध्दास्थानी असलेल्या मानूर (मणीपुर ) या ऐतीहासिक नगरीमधे शुक्रवारी गोहत्या प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता , संबधीत आरोपीस पोलीसांनी अटक देखील केली मात्र त्या नंतर शांतता व सलोखा कायम राहण्यासाठी महसुल व पोलीस प्रशासनाकडून ग्रामस्थांची बैठक बोलावून शांतता व सलोखा कायम ठेवण्याचे आवाहन करण्यात आले , सध्या मानूर मधे परिस्थिती पुर्वपदावर आली असल्याचे सांगण्यात आले.

शुक्रवारी सकाळी पोलीसांनी केलेल्या छापेमारीत आरोपीकडे कांही मांस व मारण्याच्या उद्देशाने आणलेले दोन गोवंश ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला शिवाय आरोपीस अटक देखील केली .

याउपर शांतता व सलोखा बिघडू नये , एकाने केलेल्या गुन्ह्यात सर्वांनाच जबाबदार धरू नये , गुन्हा केला त्यांना नियमाप्रमाणे सजा होईल , परंतू गावांतील वातावरण गढूळ होऊ नये



यासाठी शनिवारी बैठक बोलावून दोन्ही समुहाला शांततेचे आवाहन केले गेले . शांतता बैठकीस तहसीलदार सुरेश घोळवे, स. पो. नि. राजेश गडवे ,पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी सह गावातील प्रतिष्ठित नागरीक यांची उपस्थिती होती. सर्वांनीच गावच्या भल्यासाठी शांतता कायम राखण्याचे आवाहन केले. गुन्हा घडल्यानंतर काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस तैनात करण्यात आले होते मात्र बैठकीनंतर वातावरण शांत होऊन परिस्थिती नियंत्रणात असल्याची माहिती पोलीस सुत्राकडून देण्यात आली .

झालेल्या कृत्याचा आम्ही देखील निषेध करतो यापुढे असे गैरकृत्य कोणी करणार नाही आणि केलेच तर त्यासाठी आम्ही पुढाकार घेऊ , गावांत गोवंश हत्त्या बंदी समिती स्थापन करा त्यात मुस्लीम बांधव देखील सदस्य म्हणून घ्या परंतू आपल्या गावची शांतता व सलोखा कायम ठेवा असे आवाहन मुस्लिम बांधवाच्या वतीने करण्यात आले .

शांतता व सामाजिक सलोखा बाधीत होईल अथवा दोन समाजात तेढ निर्माण होईल असे वक्तव्य अथवा सोशल मिडीया वर अक्षेपार्ह विधान अथवा अफवा पसरवल्यास त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात येईल असे स. पो. नि. राजेश गडवे यांनी केले आहे .

# सुरेशराव हिवरेकर यांचे निधन



अंबाजोगाई(प्रतिनिधी)

अंबाजोगाई पिपल्स बँकेचे माजी संचालक सुरेश अवधुतराव देशपांडे (हिवरेकर) (वय ८७) यांचे शनिवार ३० मे रोजी सकाळी हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८७ होते. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले, एक मुलगी,जावई, सुना, नातवंडे,भाऊ, बहिणी असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मुकूंदराज समाधी रस्त्यालगतच्या नृसिंहतीर्थ स्मशानभुमी येथे ३१ मे रोजी सकाळी साडे नऊ वाजता अत्यंसंस्कार करण्यात येणार आहेत खोलेश्वर महाविद्यालयातील प्रा. सतिश हिवरेकर यांचे ते वडील होते.

# बेकायदेशीर ट्रान्सफॉर्मर शिफ्टिंग ठरली जीवघेणी;
# विजेच्या धक्क्याने पोखरीच्या तरुणाचा मृत्यू

तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

केज तालुक्यातील लाडेवडगाव येथे शेतातील ट्रान्सफॉर्मर (एचव्हीडीएस डीपी) दुसऱ्या ठिकाणी हलवण्याचे बेकायदेशीर काम करत असताना, वीज पुरवठा अचानक सुरू झाल्याने विजेचा तीव्र धक्का लागून संतोष सोनेराव निकम (वय ३८, रा. पोखरी, ता. अंबाजोगाई) या तरुण कामगाराचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

ही घटना मंगळवारी, २६ मे रोजी दुपारी लाडेवडगाव शिवारात घडली. कामाच्या ठिकाणी कोणतीही सुरक्षेची साधने न पुरवता, कमालीचा निष्काळजीपणा आणि हलगर्जीपणा करून मजुराच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी खाजगी कंत्राटदार सचिन भागवत शेप, शेतकरी सुभाष शाहूराव ढाकणे आणि महावितरणच्या एका लाईनमनविरुद्ध युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लाडेवडगाव येथील शेतकरी सुभाष ढाकणे यांच्या शेतात 'एक शेतकरी, एक ट्रान्सफॉर्मर' या योजनेअंतर्गत महावितरणची डीपी उभारण्यात आली होती. ही डीपी शासकीय नियम बाजूला ठेवून, शिफ्टिंग चार्ज वाचवण्यासाठी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय आणि त्यांना अंधारात ठेवून दुसऱ्या ठिकाणी हलवण्याचे काम खाजगी कंत्राटदार सचिन शेप याच्या माध्यमातून सुरू होते. या कामासाठी संतोष निकम यांच्यासह इतर तीन मजुरांना रोजंदारीवर बोलावण्यात आले होते. काम सुरू करण्यापूर्वी वीज



पुरवठा खंडित केल्याची खात्री करण्याचे काम लाईनमनचे होते.लाईनमनने वीज पुरवठा बंद असल्याचे सांगून तिथून पळ काढला, तर कंत्राटदार आणि शेतकऱ्याने संतोष यांना खांबावर चढण्यास सांगितले. संतोष सोनेराव निकम हे ट्रान्सफॉर्मरवरील मुख्य वायर सोडवण्यासाठी वर चढले असता, अचानक वीजप्रवाह सुरू झाला. विजेचा जोरदार झटका बसल्याने संतोष थेट खाली कोसळले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

कंत्राटदार लाईनमन यांचे घटनास्थळावरून पलायन

दरम्यान अपघातानंतर कंत्राटदार सचिन शेप घटनास्थळावरून आणि रुग्णालयातून पळून गेला. या घटनेची माहिती मिळताच मृताच्या नातेवाईकांनी आणि पोखरी येथील ग्रामस्थांनी अंबाजोगाई येथील महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालया समोर आक्रमक पवित्रा घेतला. दोषी कंत्राटदार, लाईनमन आणि संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केल्याशिवाय मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका घेत नातेवाईकांनी तीव्र आंदोलन केले. अखेर महावितरणच्या धारूर उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता गोकुळ मोरे आणि कनिष्ठ अभियंता अभिजित पाटील यांनी दिलेल्या पत्रानंतर पोलिसांनी कायदेशीर कारवाई सुरू केली. मृतक संतोष यांचे भाऊ प्रदीप सोनेराव निकम यांनी दिलेल्या जबाबावरून युसुफ वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक भीमराव मांजरे या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

# १०० कोटींच्या रस्ते प्रकल्पात नवा वाद

## उपअभियंता कार्यालयाच्या संरक्षण भिंतीची अनधिकृत तोडफोड; कंपनीच्या व्यवस्थापका विरुद्ध गुन्हा दाखल

नायगाव तालुक्यातील उमरी-नायगाव या शंभर कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी सिमेंट रस्ता प्रकल्पातील वाद थांबण्याचे नाव घेत नसतानाच आता आणखी एक गंभीर प्रकार समोर आला आहे. पाटबंधारे विभागाच्या कोणत्याही पूर्वपरवानगीशिवाय नायगाव येथील प्रकल्प उपअभियंता कार्यालय व विश्रामगृह परिसरातील संरक्षण भिंत मध्यरात्री बुलडोझरच्या साहाय्याने पाडण्यात आल्याचा धक्कादायक आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित कंपनीच्या वरिष्ठ व्यवस्थापकाविरुद्ध नायगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.



उमरी-नायगाव हा सुमारे २९ किलोमीटर लांबीचा रस्ता प्रकल्प सुरुवातीपासूनच विविध कारणांनी चर्चेत राहिला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी सुरू असलेल्या बंदिस्त नाल्यांच्या कामांबाबत ग्रामस्थ, शेतकरी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वारंवार निकृष्ट दर्जाच्या कामांची तक्रार केली होती. अनेक ठिकाणी नागरिकांनी आंदोलन छेडत कामेही बंद पाडली होती. त्यानंतर आता शासकीय मालमत्तेचीच तोडफोड झाल्याचा आरोप पुढे आल्याने प्रकल्पावरील प्रश्नचिन्ह आणखी गडद झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नायगाव शहरातील मानार प्रकल्प उपअभियंता कार्यालय व विश्रामगृह परिसरातील संरक्षण भिंत रात्रीच्या वेळी बुलडोझरने जमीनदोस्त करण्यात आली. ही भिंत जलसंपदा विभागाच्या मालकीची असून कोणतीही पूर्वपरवानगी न घेता ती पाडण्यात आल्याने विभागाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या घटनेमुळे शासनाचे सुमारे ११ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

या घटनेनंतर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. प्रकल्पावर देखरेख ठेवणारे अधिकारी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी कमी दिसत असल्याने कंत्राटदार मनमानी पद्धतीने काम करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

या संदर्भात नायगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. दरम्यान, या प्रकरणामुळे आधीच वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या उमरी-नायगाव रस्ता प्रकल्पावरील संशय अधिकच वाढला असून प्रशासन आता नेमकी कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# अवैध इंधनविक्रीवर नजर; लोह्यात १९ पेट्रोल पंपांवर बैठे पथक तैनात

### शहरातील एका पंपास सील; ११६ कर्मचाऱ्यांची निगराणी

लोहा : तालुक्यात अवैध इंधनसाठा व विक्री रोखण्यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलली असून १९ पेट्रोल पंपांवर तलाठी, ग्रामसेवक व पोलीस पाटील यांची बैठे पथके नियुक्त करण्यात आली आहेत. तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या आदेशानुसार प्रत्येक पंपावर बारा-बारा तासांच्या दोन पाळ्यांमध्ये कर्मचारी तैनात राहणार आहेत. या मोहिमेसाठी दोन मंडळ अधिकारी, ३६ तलाठी, ४० ग्रामसेवक व ३८ पोलीस पाटील अशा एकूण ११६ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तालुक्यात सध्या दररोज ७८ हजार ३९१ लिटर डिझेल, १ लाख १७ हजार १४९ लिटर पेट्रोल व ७ हजार लिटर पॉवर पेट्रोलचा पुरवठा होत आहे. संबंधित पेट्रोल पंपावर मागील वर्षी याच दिवशी झालेल्या विक्रीच्या आधारे पेट्रोलियम कंपन्यांकडून पुरवठा केला जात असल्याने अतिरिक्त इंधन उपलब्ध होत नसल्याची माहिती प्रशासनाने दिली. इंधनवाटप सुरळीत ठेवण्यासाठी तहसील कार्यालयात नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे. पुरवठा निरीक्षक एन. जी. रोहनकार यांच्या नेतृत्वाखाली वरिष्ठ महसूल सहाय्यक खोब्राजी जाधव, लिपिक दत्ता गायकवाड व सेवक विजय लोखंडे हे नियंत्रण कक्षात कार्यरत राहणार आहेत. नागरिकांना पेट्रोल-डिझेलसंदर्भात अडचणी अथवा तक्रारी असल्यास येथे संपर्क साधता येणार आहे.

दरम्यान, लोहा शहरातील एका जुन्या पेट्रोल पंपावर मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने संबंधित पेट्रोलियम कंपनीने तो तात्पुरता सील केला आहे. स्वच्छतागृह, हवा भरण्याची सुविधा व इतर आवश्यक सुविधा नसल्याने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मिळाली.तालुक्यातील वाका येथील पेट्रोल पंपावर काही दिवसांपूर्वी ग्राहकांसोबत झालेल्या वादाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर तहसील प्रशासनाने संबंधित चालकास कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.अवैध साठेबाजी रोखण्यासाठी प्रशासनाने कॅन, पिप्पा व टाक्यांमध्ये पेट्रोल-डिझेल देण्यास बंदी घातली असून सर्व पंपांवर पोलीस बंदोबस्तात इंधनवाटप करण्यात येणार आहे.

# अर्धापुरात कायद्याचे रक्षकच बनले भक्षक;शेतात हळदीसाठी बेड मारीत असताना महिलेला मारहाण,विनयभंग

पोलीस कर्मचाऱ्यासह चौघांविरुद्ध गुन्हा

अर्धापूर (प्रतिनिधी): तालुक्यातील मालेगाव येथे शेतात हाळदीचे ट्रॅक्टरने बेड मारीत असताना एका पोलीस कर्मचाऱ्यासह चौघांनी मिळून महिला फिर्यादी आणि त्यांच्या कुटुंबियांवर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घडली आहे. या प्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींनी मी पोलीस आहे माझे कोणी काही वाकडे करू शकत नाही अशी धमकी दिली आहे.



पोलीस सुत्रानकडुन मिळालेल्या माहितीनुसार मालेगाव येथील गट क्रमांक १५७ मध्ये फिर्यादी महीला यांच्या सास-याच्या शेतात हळदीचे बेड तयार करण्याचे काम सुरू होते. यावेळी आरोपी रेवन उर्फ अर्जुन सिद्धेश्वर स्वामी हिंगोली जिल्ह्यातील एका पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार म्हणून कार्यरत आहे), रघुनाथ सिद्धेश्वर स्वामी, सिद्धेश्वर नागनाथ स्वामी व एक महिला यांनी ट्रॅक्टर अडवून काम बंद पाडले. आरोपींनी फिर्यादी महिलेस अश्लील शिवीगाळ करत आरोपी रेवन स्वामी याने फिर्यादीचा हात धरून ओढणी ओढली आणि जमिनीवर पाडून त्यांचा विनयभंग केला. त्यानंतर रघुनाथ स्वामी याने फिर्यादी महिलेचा विनयभंग केला. भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या फिर्यादीच्या पतीला आरोपी रघुनाथने हातातील कड्याने तोंडावर व मानेवर मारहाण केली ज्यामुळे त्यांचा एक दात पडला असून ते गंभीर जखमी झाले आहेत. आरोपींनी फिर्यादीचे दीर आणि सासू यांनाही लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण केली.

घटनेच्या वेळी आरोपी पोलीस कर्मचारी रेवन स्वामी याने स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर करत मी पोलीस आहे माझे कोणी वाकडे करू शकत नाही तुला खोट्या केसमध्ये अडकवतो अशी उघड धमकी दिली. या प्रकरणी महिलेच्या फिर्यादीवरून अर्धापूर पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार हट्टा पोलीस ठाणे रेवन उर्फ अर्जुन सिद्धेश्वर स्वामी, रघुनाथ सिध्देश्वर स्वामी,सिध्देश्वर नागनाथ स्वामी व एका महिले विरूद्ध भा.न्या.सं. (बिएनएस) च्या कलम ३२९(३), १२६(२), २९६, ११५(२), ७४, ११७(२), ३५१(२), ३(५) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम,सपोनि.विष्णुपंत कराळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास जमादार बालाजी चाटे हे करत आहेत.

# कुऱ्हाडीने डोक्यात वार; दहा दिवसांपासून आरोपी मोकाट

## बनचिचोली येथील प्रकारामुळे नागरिकांमध्ये संताप

तामसा (प्रतिनिधी)

हदगाव तालुक्यातील बनचिचोली येथे क्षुल्लक कारणावरून एका ४२ वर्षीय मेकॅनिकल व्यावसायिकावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. जखमी व्यक्तीने उपचार घेतल्यानंतर हदगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. मात्र, गंभीर स्वरूपाचा गुन्हा असूनही आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गावातील विद्युत मोटार जळाल्यानंतर नवीन स्टार्टर खरेदीसाठी नागरिकांनी वर्गणी जमा केली होती. संबंधित काम गावातील मेकॅनिकल व्यावसायिकाकडे सोपविण्यात आले होते. याच कारणावरून झालेल्या वादातून दोन आरोपींनी संबंधित व्यक्तीस मारहाण केली. यापैकी एका आरोपीने कुऱ्हाडीने डोक्यात वार केल्याने तो गंभीर जखमी झाला.

वेळीच उपचार मिळाल्याने जखमी व्यक्तीचा जीव वाचला. तक्रार दाखल झाल्यानंतरही पोलिसांनी गंभीर गुन्ह्याऐवजी एनसी (अदखलपात्र गुन्हा) दाखल केल्याचा आरोप फिर्यादी पक्षाने केला आहे. घटनेला दहा दिवसांहून अधिक कालावधी उलटूनही आरोपी मोकाट फिरत असल्याचे सांगण्यात येत आहे.

या प्रकरणामुळे फिर्यादी व त्यांचे कुटुंबीय भीतीच्या वातावरणात राहत असून आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी गावकऱ्यांसह नातेवाईकांनी केली आहे.

दरम्यान, जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी अशा गंभीर घटनांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे. आरोपींवर योग्य कलमान्वये गुन्हा दाखल करून त्वरित अटक करण्यात यावी, अशी मागणी बनचिचोली ग्रामस्थांनी केली आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान स्पर्धेत पिंपळगाव म.व शेलगाव बु. जिल्हास्तरीय मूल्यमापन करिता पात्र

अर्धापूर,(प्रतिनिधी)

तालुक्यातील पिंपळगाव महादेव व शेलगाव बु. या दोन्ही ग्रामपंचायती मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान स्पर्धेत पात्र ठरल्या आहेत. या ग्रामपंचायतींचे मूल्यमापन १ ते २ जून या कालावधीमध्ये होणार असून सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, सूर्यकांत भुजबळ, अमोल जाधव यांसह १२ अधिकारी भेट देऊन पाहणी करणार आहेत.

तालुकास्तरीय मूल्यमापन समितीने तालुक्यातील पिंपळगाव महादेव, शेलगाव बु., पार्डी मक्ता, बामणी, बारसगाव, डौर, धामदरी व उमरी या गावांची पाहणी केली होती. यामधून ५ ग्रामपंचायती तालुकास्तरीय मूल्यमापन स्पर्धेत बक्षीसपात्र ठरणार आहेत.

## मानूरमधे गोहत्या प्रकरणी गुन्हा दाखल
## आरोपीच्या दारात एक कालवड व एक गो-हा मिळून आला

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील मानूर येथे गो हत्येबाबत पोलिसांना सुगावा लागल्यावरून पहाटे सहाच्या सुमारास पोलीसांनी केलेल्या कारवाईत गाईचे मांस व मारण्याच्या उद्देशाने घरासमोर बांधलेली एक कारवड व एक गो-हा असा मुद्देमाल मिळून आल्याने आरोपींविरुद्ध रितसर गुन्हा दाखल करण्यात आला.सविस्तर मिळालेल्या माहितीनुसार मानूर येथे गोहत्या होत असल्याचा सुगावा लागला.पोलीसांनी सकाळीच सदरील ठिकाणी छापा मारला असता आरोपी रज्जा मुसा शेख व मुसा युसुफ शेख यांचे घरासमोर चिंचेच्या झाडाखाली अंदाजे चार हजार रूपये किमतीचे गोमांस आढळून आले.त्याशिवाय एक कालवड व एक गो-हा ज्याची अंदाजीत किंमत चोवीस हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात येऊन आरोपी विरोधात गु.र.न.१०६/२०२६ कलम ३२५ ,३(५) बीएनस आणि ९,९(ए)महाराष्ट्र पशुकायदा १९७६ प्रमाणे गुन्हा दाखल केला.फिर्यादी सतीष गोविंद खाडे (पोलीस ) पो.स्टे.शिरूर यांचे फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास स.पो.नि.राजेश गडवे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी हे करत आहेत.

# अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाची तात्काळ अंमलबजावणी करावी

## मातंग समाज बांधवांचे खा. श्रीकांत शिंदे यांना निवेदन

नायगाव (प्रतिनिधी)

महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करून आरक्षणापासून वंचित राहिलेल्या जातींना न्याय मिळवून द्यावा, अशा मागणीचे निवेदन शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्यामार्फत बालाजीराव खतगावकर यांचे, स्वीय सचिव मा. ना. एकनाथरावजी शिंदे , उपमुख्यमंत्री यांच्याकडे सादर करण्यात आले.

सदर निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रात अनुसूचित जातींना शिक्षण व नोकरीमध्ये १३ टक्के आरक्षण असून या प्रवर्गात ५९ जातींचा समावेश आहे. मात्र, आरक्षणाचा लाभ केवळ काही मोजक्याच जातींना मोठ्या प्रमाणात मिळत असून सुमारे ५७ जाती या लाभापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

पंजाब, आंध्रप्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू, हरियाणा व कर्नाटक या राज्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या १ ऑगस्ट २०२४ च्या निर्णयानंतर उपवर्गीकरणाची अंमलबजावणी केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्रात काही लोक सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात वक्तव्य करून संभ्रम निर्माण करीत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

निवेदनानुसार, माजी न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने १६ एप्रिल २०२६ रोजी शासनाला अहवाल सादर केला असून त्यावरील हरकतींची मुदत ३० एप्रिल २०२६ रोजी संपली आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ कायदा करून उपवर्गीकरणाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, सेवा भरतीतील अनुशेष इ.स. १९६० पासून आजपर्यंत तातडीने भरावा आणि उपवर्गीकरणाची अंमलबजावणी होईपर्यंत मेगा भरती करू नये, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

अनुसूचित जातीतील सर्व घटकांना समान संधी व समान दर्जा मिळावा, भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेतील समतेचा हेतू साध्य व्हावा, तसेच न्यायमूर्ती अनंत बदर समिती व लहुजी साळवे अभ्यास आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली आहे.

आज नायगाव येथे उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांचे सुपुत्र खासदार श्रीकांतजी शिंदे यांच्याकडेही निवेदनाची प्रत देण्यात आली.या वेळी निवेदन देताना. रावसाहेब पवार, गणपत रेड्डी, रवींद्र भालेराव ,भीमराव बैलके, एकनाथ वाघमारे,आर एम सूर्यवंशी, अँड.बी.एम वाघमारे, संभाजीराव शेळके,प्रमोद केसराळीकर, मल्हारी तोटरे, रामेश्वर गायकवाड, संग्राम निवृत्ती बेलकर, नगरसेवक दयानंद भालेराव, बालाजी भालेराव, माधव भालेराव, सुरेश वाघमारे ,माधव सोंजे, बापूराव गायकवाड, परमेश्वर वाघमारे, सुधाकर वाघमारे,प्रा.नागनाथ मनुरे, डॉ.भिष्म झुंजारे, डॉ प्रभाकर गायकवाड यासह अनेक जणांची उपस्थिती होती.

# पुण्यात दारु पिऊन १८ जणांचा मृत्यू

## आता हादरवणारं कारण आलं समोर, दारुकांड प्रकरणात धक्कादायक माहिती

पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये विषारी दारूमुळे मृत्यूचं तांडव पाहायला मिळालं आणि अवघ्या दोन दिवसांत तब्बल १८ जणांचा मृत्यू झाला. पिंपरी चिंचवडच्या फुगेवाडी - दापोडीत १२ जणांचा मृत्यू झालाय तर पुण्यातील हडपसरमध्ये सहा जण मृत्युमुखी पडले. फुगेवाडीतील आणखी सहा जणांची प्रकृती गंभीर आहे. दरम्यान या विषारी दारू प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली आहे.



दारुच्या प्रत्येक कॅनमागे अधिकचा नफा मिळावा यासाठी योगेश वानखेडेने दारूमध्ये मिथेनॉल मिसळल्याचं पोलीस तपासात समोर आलंय. उरळी कांचनमधे देशी दारुची भट्टी चालवणाऱ्या राधेश्याम प्रजापतीकडून योगेश वानखेडे ३५ लिटरचा एक कॅन एकोणीसशे रुपये या दराने दारु खरेदी करायचा. त्यानंतर ती दारु तो पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील विविध दारु गुत्त्यांवर सत्तावीसशे रुपये प्रति कॅन या दराने विकायचा. मात्र ती दारु दुप्पट करण्यासाठी ऑनलाईन मागवलेलं मिथेनॉल मिसळायचा. ज्यामुळे दारुचे प्रमाण वाढले. मात्र ही दारु अनेकांच्या मृत्यूला कारणीभूत ठरली.

पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील दारूकांड प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग केला. याप्रकरणी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणात हडपसर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी मोगले , एपीआय सिकलगर आणि पोलीस उपनिरीक्षक मुलानी यांना निलंबित करण्यात आलं आहे. आतापर्यंत या प्रकरणात ८ जणांना पोलिसांनी अटक केली असून यातील ४ आरोपींना ८ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

सदर प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. या प्रकरणात माझं पुणे पोलीस आयुक्तांशी बोलणं झालेलं आहे. कुठल्या ठिकाणी विषारी दारू तयार झाली हे पोलिसांनी शोधून काढलेले आहे. याच्या पाठीमागे जे काही लोक आहेत, त्यांना अटक करण्यात आलेली आहे. आणखी काही लोक यात असू शकतात. ते शोधण्याचे काम सध्या सुरू आहे. ज्यांची प्रकृती गंभीर आहे त्यांना उपचार करून वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ही घटना अत्यंत गंभीर आहे. ज्या ठिकाणी हे सगळं तयार झालं त्याच्या पाठीमागे कोण-कोण आहेत हे पोलीस शोधून काढत आहेत. आतापर्यंत आठ लोकांना अटक झाली आहे. अजून काही लोकांना अटक होऊ शकते. या प्रकरणातील संपूर्ण साखळी शोधून त्यांच्यावर अतिशय कडक कारवाई केली जाईल. कारण ही एक प्रकारे हत्याच आहे, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

# होर्मुज जलडमरूमध्यावरील नाकेबंदी हटवणार? ट्रम्प यांची मोठी घोषणा

## जागतिक तेलबाजाराला दिलासा, इराणसमोर कठोर अटी

वॉशिंग्टन : अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या शांतता चर्चेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ऊरश्रव ढींाि यांनी एक महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. होर्मुज जलडमरूमध्यातील नौदल नाकेबंदी हटविण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी जाहीर केले. या निर्णयामुळे अनेक दिवसांपासून अडकून पडलेले तेलवाहू टँकर आणि मालवाहू जहाजांना मोठा दिलासा मिळणार असून जागतिक तेलपुरवठा पुन्हा सुरळीत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



जगातील सर्वात महत्त्वाच्या सागरी व्यापारमार्गांपैकी एक असलेल्या होर्मुज जलडमरूमधून दररोज मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलाची वाहतूक होते. गेल्या काही काळात वाढलेल्या तणावामुळे या मार्गावर कडक नौदल नाकेबंदी लागू करण्यात आली होती. परिणामी अनेक देशांचे तेलवाहू टँकर आणि व्यापारी जहाजे समुद्रातच अडकून पडली होती. याचा थेट परिणाम जागतिक तेलबाजारावर होत होता. ट्रम्प यांनी दिलेल्या माहितीनुसार, नाकेबंदी हटवल्यानंतर अमेरिकन सैन्याची टप्प्याटप्प्याने माघार सुरू होणार आहे. यामुळे संबंधित भागातील तणाव कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच या मार्गावरून होणारी आंतरराष्ट्रीय व्यापार वाहतूक पुन्हा पूर्ववत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

जागतिक बाजारपेठेसाठी दिलासादायक बातमी

होर्मुज जलडमरूमधील तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती वाढण्याची भीती निर्माण झाली होती. अनेक तेल आयात करणारे देश पुरवठ्याबाबत चिंतेत होते. अशा परिस्थितीत नाकेबंदी हटविण्याचा निर्णय हा जागतिक अर्थव्यवस्थेसाठी सकारात्मक संकेत मानला जात आहे. विशेषतः आशिया आणि युरोपमधील ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या देशांना या निर्णयाचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. व्यापारतज्ज्ञांच्या मते, समुद्री वाहतूक सुरळीत झाल्यास तेलाच्या किंमतींवरील दबाव कमी होऊ शकतो.